# आशय

## डॉ. श्रीराम लागू विशेषांक

२०१९-२०२०

अंक दुसरा

फेब्रुवारी २०२०



तत्वचिंतक

नटसम्राट

डॉ. श्रीराम लागू



डॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



संस्थापक : प्रा. डॉ. वीणा सानेकर
मराठी विभागप्रमुख आणि
प्रभारी प्राचार्या

मार्गदर्शक : प्रा. अभिजीत देशपांडे

विद्यार्थी संपादक मंडळ:

संपादक : गौरी पाताडे

समिती : रुचिता सावंत
अस्मिता सावंत
अलंकार रोडगे
गौरी पाताडे
श्रद्धा कदम
सिद्धी चोरगे
अक्सा खान
सायली मोरे
परशुराम गावडे



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक

# आशय फेब्रुवारी २०२०



## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| डॉ लागूंच्या जीवनाची सुरुवात | |
| माझे व्यसन | (लमाण) डॉ लागू |
| त्याला क्षमा नाही. | (लमाण) डॉ लागू |
| अंधश्रद्धा निर्मूलनाच्या वाटेवरच्या सच्चासाथी | सारांश (महाराष्ट्र टाइम्स) |
| रेखा देशपांडे | |
| तारुण्याचा सळसळता झरा! | जयप्रद देसाई |
| देव आणि मी | |
| तत्वचिंतक नटसम्राट | महेंद्र सुके |
| भूमिकेचा न्यायदाता | रश्मी माने |
| पीडीमधील दिवस... | डॉ लागू |
| भूमिका जगायची नसते | |
| नाटक... नटासाठी की प्रेक्षकांसाठी ? | |
| माझे करियर | डॉ लागू (लमाण) |
| पिंजरा | डॉ लागू (लमाण) |
| 'संगीत नाटक अकादमी' पुरस्कार | डॉ लागू (लमाण) |




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०





डॉ लागूनी अभिनय व दिग्दर्शन केलेली नाटके

नाटक कलेतील धार्मिकता (नमाण) डॉ लागू

मला दिसलेले डॉक्टर अजित पवार


डॉ लागू

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



नटसम्राट गणपतराव
बेलवलकरांसारखी अनेक
पात्रे रंगभूमीवर चिरंजीव
करणारे, अनेक नाटककारांना
प्रयोजन देणारे,
विचार स्वातंत्र्याची चळवळ,
अंधश्रद्धा निर्मूलन
यांसारख्या सार्वजनिक
महत्त्वाच्या कामांत
आघाडीवर राहणारे
आणि सामाजिक कृतज्ञता
निधीला नेतृत्व देणारे
डॉक्टर 'श्रीराम लागू'
यांनी आपल्या विविध भूमिकांवर
भरभरून प्रेम केले. व ते
प्रेक्षकांपर्यंत पोहचवले...



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




डॉ लागूंच्या जीवनाची सुरुवात...

डॉ श्रीराम बाळकृष्ण लागू यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२७ सातारमध्ये झाला. त्यांच्या आठवणीतले सगळे बालपण पुण्यात गेले. त्यांच्या आईचे माहेर साताऱ्यात होते. त्यांचे लागूंचे मूळ गाव कोकणात दापोलीजवळ केळशी आंजर्ले नावाचे आहे. त्यांचे आजोबा हे मामलेदार किंवा तत्सम सरकारी अधिकारी असल्याने सदैव फिरतीवर असत. सांगली, कवठे-महांकाळ या गावांशी त्यांचा विशेष संबंध असे.

त्यांचे वडिल १९२० साली, फायनल एम.बी.बी.एस च्या परीक्षेला फक्त तीन महिने बाकी असताना महात्मा गांधींनी असहकाराची चळवळ सुरु केली. आणि सरकारी शाळा-कॉलेज-नोकऱ्यांवर बहिष्कार टाकण्याचे सर्वांना आवाहन केले. त्याला साद देऊन, पदवी परीक्षेला फक्त तीन महिने बाकी असताना. आणि यशाची शंभर टक्के खात्री असताना. लागू यांच्या वडिलांनी कॉलेज सोडून गांधीजींच्या चळवळीत भाग घ्यायचे ठरविले! कॉलेज सोडून दिले!

पुढे चळवळ संपल्यावर सरकारी कॉलेजातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी आणि एकूणच राष्ट्रीय शिक्षणाचे ध्येय ठेवून स्थापन झालेल्या 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' या संस्थेने अर्धवट शिक्षण सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन, उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदव्या दिल्या.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ श्रीराम लागू हे आपल्या 'लमाण' ह्या आत्मचरित्रातल्या अपघाताने त्यांनी अभिनय या क्षेत्रात कसा प्रवेश केला. हे एका प्रसंगात आपल्याला सांगतात.

मराठी चौथीची परीक्षा मी हां हां म्हणताना पास झालो. आणि इंग्रजी पहिलीत गेलो. माझे मुंडले नावाचे शिक्षक अचानक तासाला वर्गात आले. त्यांनी एकदम घोषणा केली. "शाळेचे गॅदरिंग जवळ आलेले आहे. आणि त्यात करमणुकीच्या कार्यक्रमांमध्ये आपल्याला एक 'नाटिका' करायची आहे!" नाटिका म्हणजे काय आम्हांला कुणालाच माहित नव्हतं मग त्यांनी एका मुलाला "तू (म्हणजे मी) गोपाळ कृष्ण गोखले व्हायचं आणि इतर दोघांना लोकमान्य टिळक आणि एकाला दादाभाई नौरोजी" अशी तिघांना तीन पात्र वाटून दिली. आणि पुढे म्हणाले, " तुम्ही तिघांनी संवाद पाठ करायचे. आणि मी म्हणेन तसे तोंडपाठ म्हणायचे. आणखी एक 'सरोजिनी नायडू' लागेल. ती मुलींच्या शाळेतून आणू." मुलींची शाळा आमच्या शाळेला लागूनच होती. लवकरच आमच्या चौघांनाही ही नाटिका पाठांतर झाली.

गॅदरिंगचा दिवस उजाडला. शाळेच्या चारी बाजूंच्या दगडी इमारतींच्या मध्यभागी भला थोरला चौक होता त्याच्या एका बाजूला स्टेज बांधले होते. आणि समोर चौकात प्रेक्षकांना




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



बसायला. पुढे भारतीय बैठक आणि मागे खुर्च्या अशी व्यवस्था होती. पाचएकशे प्रेक्षक मावत असत.

नाटक सादरीकरणाचा दिवस उगवला. प्रत्यक्ष पडदा वर जाऊन नाटिका सुरू होण्याच्या वेळी मी म्हणजेच (लागू) विंगेत उभा राहून माझ्या प्रवेशाची वाट पाहत होतो. मनावर दडपण कसलंच नव्हतं. ठराविक वाक्याच्या नंतर प्रवेश करायचा आणि पुढचे संवाद बोलायचे. पाठांतर चोख होते. पण पडदा वर गेला. आणि विंगेतून मला, समोर बसलेला प्रचंड जनसमुदाय दिसला! जगातली सगळी माणसे पोरे बनून तिथे कोलाहल करत आहेत. आणि मी दिसल्या बरोब्बर ती मला गिळंकृत करणार अशी दरदरून भिती मला वाटली. क्षणार्धात हातपाय गारठले. तोंड कोरडे पडले. जीभ टाळ्याला चिकटली. जीव वाचवण्याच्या आदिम प्रेरणेने माझा संपूर्ण कब्जा घेतला आणि मी विंगेला घट्ट धरून थरथरत उभा राहिलो. समोरच्या विंगेत शिरट्टी होऊन सर उभे होते. ते मला खुणावत होते. डोकयात घोंघावत होता समोर बसलेल्या प्रेक्षकांचा भयानक कोलाहल. स्टेजवरचा संवाद थांबला होता कारण माझ्या प्रवेशाशिवाय नाटिका पुढे जाणे शक्यच नव्हते. समोरच्या विंगेतले तर मुकदम दिसेनासे झाले. ते पडद्याच्या मागून धावत विंगेत आले.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक



# आशय फेब्रुवारी २०२०

त्यांनी मला बकोटीला धरून विंगेपासून ओरबाडून काढले आणि एखाद्या मांजराच्या पिल्लाला फेकतात तसे मुकदम स्टेजवर फेकून दिले.

मी स्टेजवर धडपडत उभा राहिलो. समोर लाखो हिंस्र जनावरांचा समुदाय. मला नाटिकेतला एक शब्द आठवेना. स्टेजवर लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, सरोजिनी नायडू माझ्याकडे पाहून प्रचंड हातवारे व खुणा करत होते. नाटिका थांबून राहीली होती. पुढे जात नव्हती. माझ्याशिवाय पुढे जाणं शक्य नव्हतं


आणि मग अचानक मला भाषण आठवलं. आणि मी भडाभडा बोलायला लागलो. मी भाषणे धडाधडा म्हणून टाकली. नाटिका संपली!

नाटिकेत काम करण्याबद्दल आम्हाला प्रत्येकाला दोन-दोन लिमलेटच्या गोळ्या मिळाल्या. मी मात्र इतका हादरलो की मनोमन प्रतिज्ञाच करून टाकली,

'पुन्हा जन्मात नाटकाच्या आसपाससुद्धा फिरकायचं नाही!'

डॉ लागू

(लमाण)






डॉ. श्रीराम लागू यांची आई सत्यभामा बाळकृष्ण लागू.

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक

# आशय फेब्रुवारी २०२०



'माझे व्यसन'


डॉ लागू आपल्याला लागलेल्या दारूच्या व्यसनाबद्दल स्पष्टीकरण देतात. ते म्हणतात. की मी वैद्यकिय कामासाठी कॅनडातील वसतिगृहात असताना. पहिल्यांदा दारू प्यायला शिकलो.

वसतिगृहात डॉक्टरांची पार्टी होती. काही तरी निमित्ताने महिन्यातून एखादी पार्टी व्हायचीच. पण ही माझी पहिलीच होती. माझ्या शेजारच्या खोलीत राहणारा डॉ. बेली माझा दोस्त झाला होता. त्याला मी विचारले की मी नवखा आहे. आणि मला दारू प्यायला शिकायचे आहे. चार-चौघात माझी फजिती होता कामा नये. तो ही फारसा दर्दी पिणारा नव्हता.

हळूहळू मी पिऊ लागलो. खूप मजा यायची. मोकळे वाटायचे. तसा मी जरा बुजरा आणि मुखदुर्बळ - पण प्यायला लागलो की खूप बोलायचो; हसायचो पार्टीत नाचायलाही शिकलो. हॉलिवूडचे एक एक हीरो आठवायचे. ते जसे पार्टीत वागायचे तसाच वागायचो मी. बोलायचो, सिगरेट ओढायचो पण भान कधी सुटायचे नाही.

एकदा मी असाच दारूच्या नशेत असताना. तेव्हा मला कॉल आला आणि मी कॉल घेतलाच "इमर्जन्सी!... श्वास पार अडकलेला आहे. वय वर्षे तीन ओठ काळे-निळे पडले आहेत. ताबडतोब ऑपरेशन करायला पाहिजे सरळ ऑपरेशन थिएटर कडे जा! अरे बाप रे! आला मेलो. 'ट्रकिऑस्टमी! गळ्यामध्ये श्वासनलिकेला भोक पाडून त्यात एक नळी घालून श्वास मोकळा करुन द्यायचा।' कपाळावर दरदरून घाम फुटला होता. कसाबसा रुमाल काढून पुसला.

तीन वर्षाची गुटगुटीत पोरगी श्वासनलिका सापडायला त्रास होणार। ऑपरेशन कसेतरी पार पडले. माझे कपडे लेंगा, शर्ट भिजून चिंब झाले होते! आणि नशा पूर्णपणे उतरली होती. पुढे कपडे बदलण्याच्या खोलीत मी ढसाढसा रडलो.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## त्याला क्षमा नाही...


काही नट इन्स्टिंग्टिव्हलीच नट असतात. आणि काही स्वतःला घडवतात, अशी आपल्याकडे समजूत आहे. तर जे इन्स्टिंग्टिव्ह नट असतात त्यांना नट म्हणून विकसित होण्यासाठी जेवढे कष्ट घ्यावे लागतात, त्यापेक्षा अधिक कष्ट स्वतःला नट म्हणून घडवणाऱ्या माणसाला घ्यावे लागतात. कारण ही जी माणसं स्वतःला इन्स्टिंग्टिव्ह नट म्हणवतात... आणि स्वतःला म्हणवतात कशाला? ती असतातच. आता निळू फुलेंचं उदाहरण माझ्यापुढे आहे. तर निळूभाऊ एखादा रोल बसवताना किती कष्ट घेतात हे मला काही माहीत नाही. आणि मुख्य म्हणजे त्याला कष्ट म्हणावं की नाही याबद्दलही मी साशंक आहे. कारण मी त्याबाबत जे करत असतो त्याला काही कष्ट म्हणायला तयार नाही. तो माझा आनंदाचा भाग असतो. निळूभाऊंचा तसा माझा एकत्र काम करण्याचा अनुभव फार थोडा आहे. एक म्हणजे मी त्यांच्या 'लग्नाची बेडी' मधलं काम... पण ते तर काय... त्यांचा आणि माझा फारसा संबंधच नसायचा. परंतु ते प्रत्यक्षात त्या भूमिकेवर किती काम करतात, किती कष्ट घेतात हे सांगणं कठीण आहे. मला असं वाटतं की, ते त्यांना कष्ट वाटत नसावेत. तो त्यांच्या गमतीचाच भाग असणार. माझ्याकरता तो गमतीचा भाग असतो तसा. मला आधी वाटलं होतं की, हा प्रश्न एखाद्या भूमिकेचा विचार करण्या संबंधात आहे. पण हा संदर्भ तर एकूण नाट्यधर्माबद्दल आहे असं दिसतय. हा शब्द सरदेशमुखांनी जेव्हा वापरला तेव्हा तो मला आवडला. 'रंगधर्मी' असा शब्द त्यांनी वापरलाय. ते कर्म नसतंच नुसतं... तो धर्मच असायला पाहिजे असं मला वाटतं. त्यासाठी जे-जे करावं लागतं ते करायला पाहिजे. ते न करणं हे माझ्या मताने इन्‌एक्सक्यूजेबल आहे. त्याला क्षमा नाही.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



पाश्चात्य जगात आता अनेक स्कूल्स आहेत ॲक्टिंगच्या. स्टॅनिस्लावस्की ॲक्टिंगचं स्कूल आहे. नंतर आरतो याने एका वेगळ्या प्रकारची शैली प्रचारात आणण्याचा प्रयत्न केला. तो स्वतः ड्रीमर होता. तो लवकर गेला. त्यांचं कॉंक्रीट स्वरूपात काही दिसत नाही. पण ग्रोटॉव्स्कीची ॲक्टरची कॉन्सेप्ट... आणि या स्कूल्स माननारी आणि त्या प्रकारे स्वतःला घडवणारी मंडळीही आपण पाश्चात्त्य जगात पाहतो. त्या प्रकारे नट स्वतःला घडवताना दिसतात. इंदिराबाईंनी (संत) यांनी कविता कशी तयार होते याच्याबद्दल एका दिवाळी अंकात लिहिलंय. लिहिता लिहिता त्या लिहून गेल्या होत्या की, कवीला त्याच्या पंचेंद्रियांपैकी कुठल्या तरी एका इंद्रियाला काहीतरी भ्रम होतो. त्याला एक दिसत असेल, किंवा काही ऐकू येत असेल, किंवा कसला वास येत असेल, कसली चव येत असेल - हा तो भ्रम असतो. आणि हा भ्रम जेव्हा तो शब्दबद्ध करतो तेव्हा त्याची कविता होते, असं त्यांनी म्हटलं आहे. म्हणजे काय की, तो भ्रम जितका लोकविलक्षण असेल किंवा ते शब्दबद्ध करण्याची प्रतिभा जेवढी लोकविलक्षण होईल तेवढी ती कविता लोकविलक्षण असेल. नटाची प्रतिभा म्हणजे कविता लिहिण्याची प्रतिभा. आणि त्याला जो भास झाला, जो भ्रम झाला, तो भ्रम किती लोकविलक्षण होता हेही महत्त्वाचं आहे. आता 'हॅम्लेट' मी वाचल्यानंतर मला भ्रम झाला. म्हणजे तो जो मला दिसला हॅम्लेट... मला दिसणारा, निळूभाऊंना दिसणारा, काशीनाथ घाणेकरांना दिसणारा... हे व्हिजन प्रत्येकाचं वेगवेगळं आहे. नटाचं इमोशनल आणि इण्टलेक्च्युअल लाइफ जितकं समृद्ध असेल - आणि त्यासाठी शंभर गोष्टी कारणीभूत आहेत... त्याचं जीवन, वैयक्तिक जीवन त्याला कारणीभूत होऊ शकतं, त्याने घेतलेले अनुभव होऊ शकतात. पण त्याचं वाचन, त्याचा अभ्यास, त्याचे प्रवास हेसुद्धा महत्त्वाचं असतं... तर त्यावर त्याचे रिस्पॉन्सिस हे भूमिकांवर अवलंबून असतात.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



नाटकातल्या संवादांमध्ये लेखकाने काही मोकळ्या जागा ठेवलेल्या असतात, किंवा त्याने त्या ठेवाव्यात. अध्याहृत जागा - ज्या रिकाम्या आहेत - म्हणजे प्रेग्नण्ट विद मीनिंग आहेत - परंतु शब्द लिहिलेले नाहीत, त्या जागा भरून काढणं हे नटाचं फार मोठं काम आहे. अशा जागा जितक्या जास्त एखादा लेखक देईल, तितकं त्याचं लेखन जास्त समृद्ध असं मी समजतो.

आपल्या जगण्याचं स्केल इतकं छोटा आहे, आपला आवाकाही छोटा आहे, नवीन अनुभव घेण्याची शक्ती आणि हिंमतही लहान आहे... तर त्याचं प्रतिबिंब आपल्या लेखनात पडणारच. त्यामुळे मला... - लेखनात कशाला? प्रत्येक क्षेत्रामध्ये अगदी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये हे जे थपाटलेपण आहे ना, ते थपाटलेपणही आपल्याकडे अभावानेच दिसणारी गोष्ट आहे. प्रेक्षकाची अभिरुची संपन्न करणारे आपणच असतो. आपण जर थिटे असलो तर प्रेक्षकपण थिटा राहणारच.

नाटक ही एक सांघिक कलाकृती आहे हे आम्ही जाणतो. संघ म्हणजे काय? तर नाटककार, निर्माता, दिग्दर्शक, रंगभूषाकार, वेशभूषाकार, नटांचा संच असा मिळून एक संघ होतो. आणि त्यातून नाटक उभं राहतं.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



अंधश्रद्धा निर्मूलनाच्या वाटेवरचा सच्चा साथी

गेल्या ३०-३५ वर्षांच्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामांमध्ये डॉ. श्रीराम लागू यांनी काही महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. डॉ लागू, निळू फुले यांच्या येण्याने लोक कार्यक्रमाला गर्दी करू लागले. या गर्दीला अंनिसचे कार्यकर्ते प्रबोधित करतील, अशी एक नम्र भूमिका ते मांडायचे. राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये लागू. निळूभाऊ अंनिससोबत फिरले. या दौऱ्यामध्ये आयोजक, संयोजक म्हणून डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या पाठोपाठ महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांचा सहभाग होता. त्यामुळे लागूंसोबत अनेक दौऱ्यांमध्ये एकत्र राहण्याची संधी अविनाश पाटील यांना मिळाली. निवासाच्या ठिकाणी थांबायची संधी मिळाली. डॉ लागूंबाबत पाटील सांगतात. ' या सहवासातून त्यांच्यातील एक त्यांच्यातील एक परफेक्शनिस्ट व्यक्तिमत्त्व पहायला मिळालं. मग ते कलावंत, अभिनेता, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ता, जबाबदार नागरिक ते अगदी माणूस म्हणून देखील असेल. परफेक्शन आपल्यात असले पाहिजे. याच्याबाबत ते फार दक्ष असायचे. त्याच्यासाठी ते सतत स्वतःला तपासत रहायचे' डॉ लागू आज हे जग सोडून गेले. असले तरी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीतील त्यांचे योगदान चिरकाल टिकून राहणार आहे.

सारांश (महाराष्ट्र टाइम्स)




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



३९ साली, जगाच्या इतिहासाला एक प्रचंड कलाटणी देणारं जागतिक महायुद्ध सुरू झालं; ४० साली गांधींचा वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला. त्यात डॉ श्रीराम लागू यांच्या आईनं भाग घेतला आणि त्यांना तीन महीने तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्यांचा धाकटा भाऊ विजय त्या वेळी जेमतेम एक वर्षाचा होता. तर त्याला घेऊनच त्यांची आई तुरुंगात गेली. ८ ऑगस्ट ४२ ला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचा 'चले जाव' ठराव पास झाला आणि साऱ्या देशाला आग लागली. सगळ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांबरोबर माझ्या वडिलांनाही ऑगस्टला अटक झाली. आणि ते बेमुदत स्थानबद्धतेत गेले. ४५ सालापर्यंत ते तुरुंगात होते. ४५ साली महायुद्ध संपले. पण संपताना हिरोशिमा आणि नागासाकीवर ॲटमबॉंब टाकून साऱ्या मानवजातीच्या डोक्यावर एका भयानक चिरंतची तरवार टांगून देऊन ते संपले; ४६ साली हिंदुस्थानचं स्वातंत्र्य आणि त्याची फाळणी दोन्ही, दृष्टिपथात आली; आणि हे सारं घडत असताना माझ्या मानगुटीला बसलेल्या नाटकाच्या भुतानं मला मात्र या कशाकडे मानही वळवू दिली नव्हती, जणू काय मी या जगात राहतच नव्हतो! मी आपला वाट पाहत होतो: 'फक्त तुझी जर दगडी भिंतशी, चळेल थोडी माझ्यासाठी!" असे ते 'लमाण' या आपल्या आत्मचरित्रात म्हणतात.

'लमाण' डॉ लागू.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ लागू 'लमाण' च्या एका संदर्भात म्हणतात. आता असंही वाटतं की याच काळात, दीडशे वर्षं पारतंत्र्यात खितपत पडलेल्या आपल्या देशाला (राजकीय) स्वातंत्र्य मिळालं. उदारमतवादाचं, बुद्धिप्रामाण्याचं बीजही याच काळात रुजलं. स्वातंत्र्यानंतर देश छिन्न-विच्छिन्न झाला; शुभंकर, परमदयाळू, विघ्नहर्त्या परमेश्वराच्या आणि अल्लाच्या नावानं स्थापन झालेल्या धर्माच्या आंधळ्या अनुयायांनी आपल्या लाखो बांधवांचं, आयाबहिणींचं रक्त गटारात ओतून दिलं; क्रूर आंधळ्या रखरखीत वाळवंटात फुलबागांचे ताटवेच ताटवे फुलवण्यासाठी ज्यानं जिवापाड प्रयत्न केला. पृथ्वी नावाच्या एका क्षुद्र ग्रहावर जन्माला आलेल्या मानव नावाच्या एका क्षुद्र प्राण्याला ज्याने नक्षत्रांच्या उंचीवर नेण्याचं स्वप्नं पाहिलं त्या गांधी नावाच्या माणसाचा आम्ही खून केला. पाठोपाठ महाराष्ट्रभर ब्राम्हणांच्या घरांची जाळपोळ. अभाळाचा कर्मठ सांधा फुटेल आणि मी मात्र माझ्यातच दंग

एवढ्या काळात माझी परीक्षा होऊन मी एम.बी.बी.एस पास झालो होतो. माझं मालती रेगेशी लग्नंही झालं आणि मी पदव्युत्तर शिक्षणासाठी ससून हॉस्पिटल मधे हाऊसमनशिप करू लागलो. हॉस्पिटलशेजारीच एक खोली राहायला मिळाली होती. आणि महिना १२५ रुपये पगार. बायको मेडिकल कॉलेजात शिकत होती, आणि तिचं माहेर जवळच सारस्वत कॉलनीत होतं. त्यामुळे ती माहेरीच रहायची. माझं काम - चोवीस तासाचं होतं मी नाक-कान-घसा सर्जरीच्या विभागात होतो.

'लमाण' डॉ लागू.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




रेखा देशपांडे

'कलाकारासाठी अभिनय हाच महत्त्वाचा असतो; माध्यमाचा भाग नंतर येतो...' असं मत मांडणारे डॉ. श्रीराम लागू हे नाट्यचित्रपटसृष्टीतले विचारवंत कृतिशील अभिनेते होते. जगण्यात जसा स्वतःचा एक विचार त्यांनी राबवला तसाच तो अभिनय आणि अभिनय व्यवहारातही! या माध्यमासाठी लागणारं अभिनयाचं वेगळं तंत्र अंगी बाणायला त्यांना वेळच लागला नाही. डॉ. श्रीराम लागू यांनी नाटकातून चित्रपटात येताना आणि मराठीतून हिंदीत जाताना त्यांचे प्रवेशही दमदारच झाले आणि त्यांचं अस्तित्व कायम जाणवत राहिलं, व्हायब्रेट होत राहिलं.

१९७३ साली आलेला 'पिंजरा' हा चित्रपट ही एक मोठीच घटना ठरली. साक्षात व्ही. शांताराम यांनी मराठी रंगभूमीवरच्या या नटसम्राटाला आपल्या चित्रपटात नायक म्हणून उभं केलं. नैतिकतेचा कर्मठ आदर्श अशा या नायकाचं स्खलन असा मोठाच धाडसी पट कथेचा होता. त्या काळात नायक हा नैतिकतेचा, गुणांचा पुतळा असे. सर्व प्रलोभनांचा आणि संकटांचा पराभव करून तो विजयी होण्याचीच पद्धत होती. 'पिंजरा'तल्या या धाडसी प्रयोगानिशी डॉ. श्रीराम लागू यांनी चित्रपट-प्रवेश केला. 'पिंजरा'च्या लोकप्रियतेनं त्यावेळेपर्यंत मरगळत चाललेल्या मराठी सिनेमातही चैतन्य निर्माण झालं.

'पिंजरा' मधल्या व्यक्तिरेखेसाठी शांतारामबापूंनी केलेली त्यांची निवड अत्यंत चपखल होती. श्रीधर मास्तर हा गावातला आदर्श शिक्षक. व्यक्तिमत्त्वात शिक्षण व उच्चवर्णीय संस्कारांमधून आलेलं साजुकपण. ब्रह्मचारी. अनेक वर्षं कडक ब्रह्मचर्य पाळत आलेला... या रूपात ते चपखल बसले. त्यांचा





# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



स्क्रीन प्रेझेन्सही प्रकर्षाने जाणवला. लवकरच 'सामना' मध्ये डॉ. श्रीराम लागू यांच्या सामना रंगला. तिथेही होती नैतिकतेचा आग्रह धरणारे दरिद्री मास्तर आणि गावरान, धनदांडगे हिंदुराव धोंडे-पाटील यांच्यातल्या द्वंद्वाची आतिषबाजी. ही जशी लेखक-पटकथाकाराच्या... विजय तेंडुलकरांच्या... लेखणीची कमाल होती, तशीच ती होती या दोघांच्या अभिनयातल्या बारकाव्यांची जादू.

'सिंहासन' मधला त्यांचा मुख्यमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेला खानदानी शहाण्णव कुळी अर्थमंत्री दाभाडेदेखील तेवढाच विश्वसनीय ठरला. खानदानी राजकीय परंपरेतून आलेल्या दर्पयुक्त आत्मविश्वास, खेळी करण्याचा कुशाग्र धूर्तपणा डॉक्टरांच्या धारदार व्यक्तिमत्त्वानं मूर्तिमंत उभा केला. अर्थात कास्टिंगला सलामच. पण पुढचं कर्तृत्व अभिनेत्याचं. रंगमंचावरचं डॉक्टरांचं कर्तृत्व, त्यांची लोकप्रियता आणि 'पिंजरा' मधलं यश यामुळे हिंदी चित्रपट निर्मात्यांचं, दिग्दर्शकांचं लक्ष वेधलं गेलं नसतं तरच नवल. त्यातून त्यांची रंगभूमी, मराठी चित्रपट आणि हिंदी चित्रपट अशी तिहेरी कारकीर्द सुरू झाली. भीमसेन यांच्या 'घरौंदा' मध्ये त्यांना पुन्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, वयाला शोभावी अशी महत्त्वाची, किंबहुना नायकाच्या बरोबरीचीच भूमिका मिळाली. या भूमिकेसाठी त्यांना जरी उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचं फिल्मफेयर पारितोषिक मिळालं. त्यांनी असंख्य हिंदी चित्रपटांतून भूमिका केल्या. मोठ्या आणि छोट्या. ज्या ज्या वेळी अशा व्यक्तिरेखा साकारायला मिळाल्या, तेव्हा त्यांचं वैशिष्ट्य ठळकपणे समोर आलं. त्यावेळी मराठी चित्रपटसृष्टीची भौतिक, आर्थिक अवस्था काही हेवा वाटण्यासारखी नव्हती. रंगभूमीवरची कारिअरही खिशाला खार लावूनच केली जात होती. डॉक्टर व्यावसायिक तसंच प्रायोगिक अशा दोन्ही रंगभूमीवर सक्रिय होते.





डॉ. श्रीराम लागू आपल्या पत्नी दिपा लागू यांच्यासोबत

आयुष्य उजळून आणि उधळून टाकणारं पाहिलं प्रेम - मालती रेगे

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक

# आशय फेब्रुवारी २०२०




## तारुण्याचा सळसळता झरा!

जयप्रद देसाई

एकदा सहज वयाचा विषय निघाला असताना, दीपामावशीकडून (लागू) नकळत डॉक्टरांच्या वयाचा उल्लेख झाला, तेव्हा डॉक्टर तिला म्हणाले: "त्यांना माझं वय काय सांगतेस? ही इज माय डॉयरेक्टर, डॅम इट! आय शूड बी एजलेस टू हिम!"

डॉक्टर खरंच 'एजलेस' होते - चिरतरुण होते. वयाची नव्वदी उलटल्यावरसुद्धा त्यांच्यात एका लहान मुलाचा निरागसपणा होता, कुतूहल होतं. या गोष्टीचा जरा खोलावर विचार केला, तर उमगतं, की कुठलाही अभिजात कलाकार हा चिरतरुणच असतो - आपल्या भोवतालच्या जगाबद्दल प्रचंड कुतूहल आणि त्या भोवतालच्या जगामध्ये आलेल्या प्रत्येक गोष्टीकडे, म्हणजे अगदी आपल्या आतल्या भावभावनांकडेसुद्धा सतत हपापल्यासारखं बघत राहतो. थकतच नाही. He's an ever-flowing fountain of youth. तारुण्याचा सळसळता झरा!


त्यांच्याशी झालेल्या अनेक भेटीगाठींमध्ये संहितेबद्दलच्या, भूमिकेबद्दलच्या चर्चांमध्ये त्या कलाकाराची उत्तुंग अशी उंची अनुभवायला मिळाली. त्यांनी विचारलेले प्रश्न इतके नेमके आणि मर्मावर बोट ठेवणारे असायचे, की त्यांना उत्तर देताना तुम्हालाच तुमची संहिता, फिल्म अधिक खोलवर कळायची. त्यांची शैली अभ्यासू असूनही ॲकेडमिक नव्हती. Intuitive होती. त्याच्यात एक तिरकस वेडसरपणा होता.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



एका कलाकाराची मोठी ताकद म्हणजे त्याचं intuition. अंतःस्फूर्ती किंवा अंतर्ज्ञान. पारंपरिक रूढ अर्थाने मानल्या जाणाऱ्या सयुक्तिक विचारांना न जुमानता, आपल्या मनाच्या सखोल गर्तेतून उमटणाऱ्या, स्वतःलाही सहजपणे माहीत नसलेल्या, शुद्ध खऱ्या भावनांवर ठेवलेला विश्वास म्हणजे intuition / अंतर्ज्ञान. डॉक्टरांच्या भूमिकेबद्दलच्या आंगिक-वाचिक मेथडबद्दल खूप बोलल गेलय.. पण त्यांच्या या instinct / intuition बद्दल क्वचितच बोलल जातं. त्यांच हे 'intuition' त्यांच्या मेथडला 'पूरक' होतं. पुढे याचा प्रत्यय मला अनेकदा आला. त्यांना संवाद लक्षात राहत नव्हते. एकेकाळी चार-पाच पानांचा संवाद बोललेल्या डॉक्टरांशी अशा वेळी अगदी त्रागा त्रागा होई. ते स्वतःवरच वैतागायचे... तणावपूर्ण प्रसंगही सेटवर घडले. वाद झाले, संताप झाला, काही काळ अबोलासुद्धा झाला; पण दुसऱ्याच क्षणाला थट्टा-विनोद आणि पुन्हा नवा वाद. कुठे जरा आकस नाही, की द्वेष नाही- नुसत भरभरून प्रेम !! शूटींगच्या शेवटच्या दिवशी त्यांनी युनिटमध्ये किती लोक आहेत, याचा हळूच घेत खास बर्फी मागवली... मोठ्या कलाकारांची 'प्रोसेस' जाणून घ्यायचं कुतूहल नेहमीच असतं. ती प्रत्यक्ष अनुभवायचं भाग्य मला माझ्या पहिल्याच चित्रपटात मिळालं.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



जेव्हा 'नागरिक' मधल्या भूमिकेसाठी त्यांनी दाढी वाढवायची असं ठरलं, तेव्हा ते दर दोन दिवसांनी फोन करून मला वाढणाऱ्या दाढीबद्दल अपडेट्स द्यायचे. त्यांचा निरागसपणा पाहून मला अगदी ओशाळल्यासारखं व्हायचं. त्यांच्या निधनानंतर सगळ्या बातम्यांमध्ये त्यांच्या वयाचा उल्लेख बघून मला शूटिंगच्या शेवटच्या दिवशी पॅक-अपनंतरचे डॉक्टर मला आठवले. जेव्हा सर्व क्रूनं टाळ्या वाजवून त्यांना अभिवादन केलं, तेव्हा त्यांनी एका बॅले डान्सरसारखं एक पाय दुमडून दुसऱ्या पायावर वजन देत, मुरडत, चक्क 'bow down' केलं.

The fountain of youth had never stopped!

जयप्रद देसाई.







डॉ. लागू यांचे वडील बाळकृष्ण लागू.

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक


# आशय फेब्रुवारी २०२०



## देव आणि मी

काही वर्षांपूर्वी मी केलेल्या एका वक्तव्याबद्दल गदारोळ उडाला होता. ते वाक्य होतं, 'देवाला आता रिटायर करायला हवं!' पण ती माझी भूमिका होती. माझ्यात हा जो काही स्पष्टवक्तेपणा आणि बिनधास्तपणा आला आहे, तो वेगवेगळ्या प्रसंगांमुळे आला आहे. विकासासाठी विचार करणं ही प्रक्रिया खूप महत्त्वाची आहे. बऱ्याचदा आपण एखाद्या त्रासदायक गोष्टीचा विचार करणं टाळतो. तर एखादी गोष्ट मला त्रास देतेय तर मी तिचा पिच्छा सोडणारच नाही, अशी भूमिकाही अनेक जण घेत असतात. मी दुसऱ्या प्रकारात मोडतो. माझ्या मते वैचारिक देवाण-घेवाण व्हायलाच हवी. ती वैचारिक घुसळण आहे आणि त्याला आपला हातभार लागलाच पाहिजे. पण म्हणून, 'मी म्हणतो तेच अंतिम सत्य आहे' ही भूमिकाही चुकीची आहे. आपल्याला वाटतं ते मांडलंच पाहिजे; परंतु त्याचबरोबर एखाद्याच्या न पटलेल्या मतांचाही तेवढ्याच खिलाडूपणे आदर करायला हवा.

देवाबद्दलच्या माझ्या त्या वक्तव्यामागे माझ्या लहानपणीची आठवण आहे... सदाशिवपेठेतील ताई रास्ते राममंदिराजवळ आमचा वाडा होता. आमचा म्हणजे, आम्ही त्यात भाडेकरू म्हणून राहत होतो. त्या वेळी त्या राममंदिराच्या पुजाऱ्याचा मुलगा प्रचंड दारू प्यायचा आणि झिंगत झिंगत झिंगत मंदिराच्याच पायऱ्यांवर बसून देवाला




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## देव आणि मी

अर्वाच्य शिव्या द्यायचा! तो आला की आम्ही घाबरून आईला बिलगून बसायचो. त्या वेळी मी आईला विचारलं होतं की, "देव सगळ्यांना सद्बुद्धी देतो असं म्हणतात. मग देव याला का नाही सद्बुद्धी देत? तो तर देवालाच शिव्या घालतोय."


दुसरा प्रसंगही त्याच दरम्यान घडलेला; त्यानंतर तर देवावरचा माझा उरलासुरला विश्वासही पार उडाला. त्या मुलाच्या घरी आम्ही खेळायला म्हणून जायचो. त्याची आई अत्यंत सत्शील आणि साध्वी स्त्री होती. एकदा आम्ही असेच त्याच्याकडे गेलो असताना तो पाट्यावर भांग वाटत बसला होता. आणि त्याची आई जवळच कपडे वाळत घालत होती. तिला पाट्यावर चटणी वाटायची होती म्हणून तिने त्याला एक-दोनदा 'लवकर आटप' असं सांगितलं. त्यावर त्यानं भडकून जवळचा कप उचलून आपल्या आईला फेकून मारला. साहजिकच तो कप फुटला आणि त्याच्या आईच्या कपाळाला जखम झाली व भळाभळा रक्त वाहू लागलं. आजही ते दृश्य माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्या वेळी तर मला अंधारीच आली होती. पण त्या मुलाला त्याचं काहीच वाटलं नाही. माझ्या डोक्यात पहिला विचार असा आला की, 'अरे, हे देवाची पुजारी आणि यानं याच्या आईला असं मारावं. अन् देवानं हे बघून कसं घेतलं! देव जर काहीच करत नसेल, तर मग त्याचा उपयोग काय? हट्, देव वगैरे काही नाही...' हे माझं मत त्या वेळीच भक्कम झालं.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



एक मात्र आहे की, देव मानत नसलो तरी मी मंदिरं मात्र आवर्जून बघायला जातो. कारण त्यातलं शिल्पकाम! या कलाकारांनी जे काही करून ठेवलंय, ते प्रचंड अद्भुत आणि अलौकिक आहे. कलेचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून त्याकडे आपण पाहू शकतो. मात्र त्यावर देवत्व लादलं जातं, हे चूक आहे. आपल्याकडे सध्या असं देवत्व लादण्याचं प्रमाण भयंकर वाढतंय. त्याला कारण म्हणजे प्रचंड प्रमाणात वाढलेली लोकसंख्या. माझ्या मते, हा आपल्यासमोरचा प्रश्न नाहीच. प्रश्न आहे तो, हे बरोबर आहे की नाही, हा. हे बरोबर नसेल, तर ते बरोबर नाही हे लोकांना सांगणं माझं कर्तव्य आहे की नाही? जर ते माझं कर्तव्य असेल, तर मी ते का करत नाही? मग मला 'मी रॅशनल आहे' वगैरे म्हणवून घेण्याचा काय अधिकार? पण चिंतेची बाब म्हणजे, हा असा विचार करणाऱ्यांची संख्याही कमी होत चालली आहे. आता एवढं सगळं होऊन, एवढे पुरावे समोर येऊनही देव, बाबा, बुवा, साधू यांची चलती आहे. पण हा ~~केवळ~~ केवळ भारतीयांसमोरचाच प्रश्न नाही, तर हे संपूर्ण जगात असंच आहे. याचं कारण म्हणजे युगानुयुगं देव वगैरे विचार बालपणापासूनच आपल्या मनात कोंबले गेले आहेत. अमुक कर नाही तर देव चिडेल, तमुक कर नाही तर देव कान कापेल, वगैरे धमक्यांमुळे आपण देवाला घाबरायला लागतो अन तो पगडा घट्ट बसतो.





# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



एकदा का या संस्कारांमध्ये माणूस अडकला, की त्याचं त्यातून बाहेर पडणं कठीण होऊन बसतं

डॉ. श्रीराम लागू





नटसम्राट, गणपतराव बेलवलकर.

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




## तत्त्वचिंतक नटसम्राट

"आपल्या उत्तुंग अभिनयानं प्रेक्षकांवर अधिराज्य करणारे आणि त्याच्याबरोबर बुद्धिप्रामाण्यवादाची कास धरून समाजजागृती करणारे डॉ. श्रीराम लागू म्हणजे नाट्यवादळच. त्यांची या दुनियेच्या रंगमंचावरून एक्झिट झाली असली, तरी या तत्त्वचिंतक नटसम्राटाचं युग हे म्हणजे नाट्यसृष्टीचा सुवर्णाक्षरी इतिहास आहे. या वादळाचे हे काही पैलू.

माणूस जन्मतो तेव्हा हे गृहीत असतं. की तो कधीतरी एक दिवस हे जग सोडून जाणार आहे; पण सर्वसाधारण माणसाचं जाणं आणि एखाद्या श्रेष्ठतम कलावंताचं जाणं यात फरक आहे. डॉ. श्रीराम लागू हे मराठी; तसंच भारतीय रंगभूमीवरील अत्यंत महत्त्वाचे अभिनेते आपल्यातून जाणं, अगदी वय ९२ असलं तरी धक्कादायक आहे. कारण त्यांचं आजूबाजूला असणंसुद्धा अत्यंत महत्त्वाचं होतं. आपल्याला एक महान कलावंत आहे, ही जाणीवसुद्धा दिलासा देणारी होती.

डॉ. लागू यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२७ रोजी सातारा इथं झाला. आणि मृत्यू १७ डिसेंबर २०१९ या ९२ वर्षांतल्या कालखंडात, 'ते देवाला रिटायर करा' असं सांगत राहिले. कारण देव या संकल्पनेमुळे समाजात अंधश्रद्धा वाढते आणि. माणूस कष्ट करायचे सोडून देव आपल्यासाठी काहीतरी करेल, या भावनेत




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



अडकून पडतो. हे त्यांना योग्य वाटत नव्हतं. त्यांना अंधश्रद्धाळू माणसांचा नव्हे, तर डोळस माणसांचा समाज हवा होता. डॉ लागूंच्या या भूमिकेतून त्यांचा संबंध अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी आला. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यासोबत ते अंधश्रद्धा निर्मूलन समितीत काम करत होते. त्याचाच एक भाग म्हणून अंनिसमध्ये पूर्ण वेळ काम करणाऱ्या समाजसेवकांना काहीतरी मानधन देता यावं, या कल्पनेतून 'सामाजिक कृतज्ञता निधी' या संकल्पनेचा जन्म झाला. या निधीसाठी 'लग्नाची बेडी' या नाटकाचे प्रयोग महाराष्ट्रभर डॉ लागू यांनी केले. या उपक्रमासाठी निळूभाऊ फुले, सदाशिव अमरापूरकर, रोहिणी हट्टंगडी अशा अनेक कलाकारांचं मौलिक सहकार्य यांना मिळाले. आजही या निधीतून अंनिसमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मानधन दिलं जातं. हे अपूर्व कार्य डॉ. लागू यांच्या संकल्पनेतून सिद्ध झालं

खरं तर डॉ. लागू कान, नाक, घसातज्ज्ञ होते. या व्यवसायातून त्यांना लाखो रुपये मिळवून गडगंज श्रीमंत होत आला असतं; पण ते त्यांनी नाकारलं. कारण लहानपणापासूनच त्यांचा कल नाट्यकलेकडे झुकलेला होता. पुण्यातल्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनमध्ये काही काळ ते रमले. पुढे पीडीएमध्ये 'घाशीराम कोतवाल' मुळे मतभेद झाले. त्यातून 'थिएटर अकादमी'चा जन्म झाला. डॉ. लागू यांनी त्यांना अपेक्षित असं थिएटर करता यावं म्हणून 'रूपवेध' या संस्थेची स्थापना केली.

डॉ. लागू हे उत्तुंग व्यक्तिमत्व मानलं जातं. ज्यांनी वि. वा. शिरवाडकर




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



यांच्या लेखणीतून उतरलेल्या 'नटसम्राट' मध्ये लागूंना पाहिले असेल, त्यांना लागू यांच्या भव्य व्यक्तिमत्वाची कल्पना येईल. 'नटसम्राट' हे नाटक डॉ. लागू यांच्यासाठीच लिहिलं असावं, इतके ते त्या भूमिकेत फिट्ट बसले होते. वास्तविक हे नाटक म्हणजे एका वयोवृद्ध अभिनेत्याची शोकांतिका; पण अभिनेत्याच्या शोकांतिकेपेक्षाही म्हातारपणात आलेल्या म्हाताऱ्याचीच ही शोकांतिका आहे. आणि त्यामुळेच या नाटकानं 'समोरचं ताट द्यावं; बसण्याचा पाट देऊ नये. असा प्रकारचं विधान या नाटकामुळेच डॉ. लागू यांना 'नटसम्राट' ही पदवी दिली गेली. डॉ. लागूंच्या नंतर दत्ता भट, सतीश दुभाषी असा अनेक मान्यवर अभिनेत्यांनी या नाटकातली अप्पासाहेब बेलवलकर ही भूमिका केली; पण तरीही नटसम्राट करावं तर डॉ. लागूंनीच असं मानलं गेलं.

डॉ. लागू यांनी वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी ते अलीकडच्या कालखंडातले त. ल. मसेकर, अजित दळवी, मी स्वत:, मकरंद साठे असा जुन्या आणि नव्या नाटककारांच्या नाटकांमधून भूमिका केल्या. त्यांनी केवळ भूमिका केल्या असं म्हणता येणार नाही, तर त्यांना स्वत:ची एक अशी स्वतंत्र नाट्यदृष्टी होती. आपल्याला नाटकातून काय सांगायचे आहे, नाटकाचा आशय काय आहे, पुरोगामी आहे की प्रतिगामी याकडेही त्यांचा कटाक्ष असे. पु. ल. देशपांडे, यांचं 'उद्ध्वस्त धर्मशाळा' हे नाटक. या नाटकातल्या डाव्या विचारसरणीच्या श्रीधर कुलकर्णी नावाच्या प्राध्यापकाची ही शोकांतिका. खरं तर डॉ. लागू हे गांधीवादी.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



गांधी विचारसरणीवर त्यांचा दृढ विश्वास; पण त्यांचा गांधीवाद श्रद्धावान नव्हता. ते अनेक वाद समजून घेण्याचा प्रयत्न करीत असत त्यामुळेच त्यांनी 'रूपवेध' या संस्थेतर्फे 'उद्ध्वस्त धर्मशाळा' सादर केलं आणि प्रायोगिक रंगभूमीवरील एक महत्त्वाचं नाटक मानलं गेलं.

'पिंजरा' आणि 'सामना' या मराठी चित्रपटांमुळे डॉ. लागूंच्या नावलौकिक, अधिक दरारा एवढा वाढलेला होता, कि त्या कालखंडातल्या आमच्यासारख्या नवोदितांना त्यांना भेटावं कसं असा प्रश्न पडायचा; पण जेव्हा त्यांच्या सहवासात येता आलं आणि मला स्वतः लाही वाटलं, कि आपण लिहिलेल्या 'किरवंत' नाटकात त्यांनी काम करावं, तेव्हा त्यांना 'किरवंत' नाटकाची संहिता पाठवली. आश्चर्य असं, कि चार दिवसांत त्यांचं पत्र; 'नाटक वाचलं. दोनदा. सुन्न झाली. हे नाटक कुणी करतंय का?' आणि पुढचं वाक्य होतं; 'मी काय करू?' मुद्दा असा, कि डॉ. लागूंच्या विषयीचं आम्ही आमच्या मनात जे रूप समजत होतो, तसं ते अजिबात नव्हतं. लेखक जुना कि नवा यापेक्षा लेखकानं काय लिहिलं, काय नवं आहे हे शोधणं त्यांना महत्त्वाचं वाटायचं. अनेकदा आपण एखाद्याविषयी न भेटताच तो गैरसमज करून घेतो. तसा तो करून घेऊ नये. त्याचं हे एक उदाहरण.

डॉ. लागू यांनी 'किरवंत' हे नाटक त्यांच्या 'रूपवेध' या संस्थेतर्फे केलं




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



आणि डॉ. लागूंच या नाटकांचं दिग्दर्शन करत आहेत, हे नाट्यसृष्टीत कळलं, तेव्हा 'डॉ लागू हे काय दिग्दर्शक आहेत? तू चांगल्या दिग्दर्शकाला का देत नाहीस?' असं बोललं गेलं. मात्र, एक दिवस डॉ. लागू स्वत:च असं म्हणाले: "जे स्वत:ला दिग्दर्शक मानतात, ते स्वत:च्या दिग्दर्शनाचे पैलू नाटकात दाखवण्याचं काम अधिक करतात. परिणामी नाटकात दिग्दर्शकच जास्त दिसतो. तुझ्या नाटकाला अशा दिग्दर्शकाची गरज नाही. नाटकाचा आशय महत्त्वाचा आणि म्हणून मीच हे नाटक दिग्दर्शित करतो आहे." म्हणजे डॉ. लागू यांच्या विचारात 'दिग्दर्शक' या कल्पनेचा स्पष्ट विचार समाविष्ट आहे, हे आपल्या लक्षात येतं. खरं तर डॉ. लागू 'किरवंत' या नाटकात भूमिका करणार नव्हते. कारण त्यांचा चेहरा काहीसा उग्र आणि 'किरवंत' मधली व्यक्तिरेखा अत्यंत दीनवाणी. मात्र, त्यांना दाताची कवळी बसवण्याची कल्पना सुचली आणि ती कवळी लावल्यामुळे चेहरा दीनवाणा होता, हे लक्षात येताच 'किरवंत' मधली ती भूमिका त्यांनी साकार केली. मुद्दा असा, की दिग्दर्शक म्हणूनही आणि अभिनेता म्हणूनही अत्यंत सखोल विचार करणं आणि आपल्या देहयष्टीला जे अनुरूप आहे, तेच साकार करणं, अशी ही नाट्यदृष्टी डॉ. लागूंकडेच होती.

नटाविषयी असं म्हटलं जातं, की 'यू आर द इन्स्ट्रुमेंट अँड यू आर द प्लेअर' म्हणजे वाद्यही तूच आणि वाजवणाराही तूच आहेस. यासोबतच नट




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



हा ॲथलिट फिलॉसॉफर असला पाहिजे. म्हणजे अभिनयाचं आहार्य, आंगिक, वाचिक आणि सात्त्विक हे चार घटक अभिनेत्याला लीलया पेलता आले पाहिजेत. डॉ. लागूंच्या अभिनयाचं वैशिष्ट्य असं, की ते या चारही घटकांचा वापर ते अत्यंत जाणीवपूर्वक करत असत आणि यामुळेच लेखकाच्या नाटकातली तात्त्विकता म्हणजे आशय नेमकेपणानं अधोरेखित होत असे. या अर्थानं डॉ. लागू हे नुसते अभिनेता नव्हे, तर 'तत्त्वचिंतक अभिनेता' होते, असे म्हटले पाहिजे. वसंत कानेटकर यांच्या 'वेड्याचे घर उन्हात' पासून मकरंद साठे यांच्या 'सूर्य पाहिलेला माणूस' पर्यंत सुमारे ५० नाटकांतून डॉ. लागू यांनी ज्या भूमिका साकारल्या, त्यात त्यांनी त्यांच्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. या सगळ्या कालखंडाचा विचार केल्यास डॉ. लागू यांनी त्यांचं युग निर्माण केलं. त्यांची या दुनियेच्या रंगमंचावरून एक्झिट झाली असली, तरी या तत्त्वचिंतक नटसम्राटाचं युग म्हणजे नाट्यसृष्टीचा सुवर्णाक्षरी इतिहास आहे.

(महेंद्र सुके)




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## भूमिकेच्या न्यायदाता

डॉ. श्रीराम लागू यांची नाटकं, चित्रपट बघतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्यांचे सामना, पिंजरा, सिंहासनासारखे चित्रपट आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. 'गांधी' मध्ये त्यांनी गोपाळकृष्ण गोखलेंची भूमिका साकारली होती. त्यांनी नाटकामधून साकारलेल्या असंख्य भूमिका अजरामर म्हणाव्या अशाच. त्यांच्या या भूमिका बघतच आम्ही आणि आमची पिढी मोठी झाली. या भूमिकांचे संस्कार आमच्यावर झाले. माझ्यासाठी आणि माझ्या वयाच्या अनेक नटांसाठी डॉक्टर लागू हे अभिनयाचं विद्यापीठच होतं. त्यांच्या कामातून आम्ही खूप काही शिकलो. गेल्या दोन ते अडीच वर्षांच्या कालावधीत त्यांच्याशी माझा वैयक्तिक संबंध आला होता. '.... आणि डॉ. काशीनाथ घाणेकर' या चित्रपटाच्या निमित्ताने मी त्यांना भेटलो होतो. त्यांच्याशी दोन ते अडीच तास खास गप्पा झाल्या होत्या.


त्यानंतर माझं 'हॅम्लेट' हे नाटक बघायलाही ते स्वतः आले होते. त्यांनी मला भरभरून आशीर्वाद दिले होते. १९८० ते ९० च्या दशकात त्यांच्या सामाजिक क्षेत्राशी संबंध आला. त्यावेळी डॉ. बाबा आढाव हे वर्षातून एकदा विषमता



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



निर्मूलन परिषदेचे आयोजन करत असत. या परिषदेच्या माध्यमातून राज्यातील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी, त्यांच्या कामातले अनुभव, त्यांच्या कामातील अडथळे, त्यांच्यासमोर असलेली आव्हानं या सर्व बाबींवर परस्परांशी संवाद करणे, युवकमित्रांना कामाचा अनुभव सांगणे आणि त्यातून युवकमित्रांना कामाच्या अनुभवाची कशा प्रकारे उभारी देता येईल, यावर विचार करून त्यामधून मार्ग काढणे, हा त्यामागचा विचार होता. साधारण देशातील आणीबाणीनंतरचा हा काळ होता. सलग १० ते १२ वर्षे विषमता निर्मूलन परिषदेचे काम सुरू राहिले. यामध्ये मराठवाडा, विदर्भ, खांदेश, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, कोकण या राज्यातील विविध भागांतून कार्यकर्ते येऊ लागले. त्यातून एक व्यापक जनसंपर्क तयार झाला. हळूहळू लक्षात येऊ लागलं की कार्यकर्त्यांच्या कामात आर्थिक अडचणीची बाब महत्त्वाची आहे. हा प्रश्न गंभीर होता. दोन अंगाने या प्रश्नाबाबत चर्चा झाली. एक तर ते कार्यकर्ते समाज बदलाच्या कार्यात आपला खारीचा वाटा उचलत असून त्यांच्या योगदानातूनच अनेक सामाजिक समस्या सोडवण्याची रुजवात होत नाही. तसेच सरकार आणि इतर समाजातील महत्त्वाचे, प्रभावी धोरण ठरवणारे




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



घटक यांच्यावरही दबाव येत असून यातून मतपरिवर्तन होत असे. म्हणजेच अंधश्रद्धेविरोधात धोरणं, कायदे, कल्याणकारी योजना तयार होत आहेत. अशा कार्यकर्त्यांकडे बघण्याचा समाजाचा संकुचित दृष्टिकोन बदलण्यासाठी त्यांच्यामागे समाजातील काही प्रतिष्ठित लोकांनी, मान्यवरांनी उभं राहणं गरजेचं होतं. तर दुसरी भूमिका म्हणजे कार्यकर्त्यांच्या कामाची समाजाने आपापल्या पद्धतीने उतराई करणे. या दोन भूमिकेतून सामाजिक कृतज्ञता निधीच्या उपक्रमाला सुरुवात झाली. आणि त्यातून प्रामुख्याने डॉ. लागू हे अंनिसशी जोडले गेले.


डॉ. लागू यांच्या जवळचे स्नेही आणि वर्गमित्र डॉ. राम आपटे हे जळगावला वैद्यकीय व्यवसाय करत असत. नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने डॉ. लागू यांचे वर्षातून एकदातरी त्यांच्याकडे जाणं-येणं होत असे. जळगावातही अंनिससाठी काम करणारे कार्यकर्ते होतं. त्यांचा संबंध डॉ. राम आपटे यांच्याशी होता. त्या ठिकाणी डॉ. आपटे यांनी कार्यकर्त्यांसाठी काही तरी करायला हवे ही कल्पना डॉ. लागूसमोर मांडली. विषमता निर्मूलन समितीच्या माध्यमातून बाबा आढाव यांनी सामाजिक कृतज्ञता निधी उपक्रमाची सुरुवात केली त्यांचा डॉ. लागू यांच्याशी स्व संपर्क होताच. शिवाय इतरही काही मान्यवरांनी यात जोडले गेले पाहिजे असा विचार समोर आला.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



त्यातून कला क्षेत्रातील डॉ. लागू, निळू फुले, सदाशिव अमरापूरकर, साहित्यिक ना. धों. महानोर असे अनेक मान्यवर या उपक्रमात सहभागी झाले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनाही बाबा आढाव यांनी त्यात सामावून घेतले. यासाठी तयार झालेल्या विश्वस्त मंडळात डॉ. लागू हे अध्यक्ष, बाबा आढाव हे कार्याध्यक्ष, तर डॉ. नरेंद्र दाभोलकर हे कार्यवाह होते. या उपक्रमाला १९८६-८७ साली सुरुवात झाली. त्यावेळी ट्रस्टच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना आर्थिक मदत करायचे ठरवले. मात्र त्यासाठी पैसा कुठून आणायचा म्हणून व्यक्तिगत पातळीवरच्या निधी आणून जमा करणे आणि दुसऱ्या बाजूला व्यापक पातळीवरच्या निधी आणून त्याचा एक कोष तयार करणे, असे ठरवले गेले. साधारण दोन टप्प्यांमध्ये एक कोटी रुपयांचा निधी गोळा करायचे निश्चित केले गेले. त्याकरता 'लग्नाची बेडी' या नाटकाचे प्रयोग राज्यभर करण्याचे ठरले. डॉ. लागू आणि निळूभाऊंसारखे त्या काळातील सुप्रसिद्ध अभिनेते हे नाटक करणारे होते. समन्वय, संवाद, आणखी, नियोजन करण्याचे काम या कलाकारांनी हाती घेतलं. नाटक बसवलं आणि नंतर त्याचे प्रयोगही झाली. डॉ. लागू आणि निळूभाऊंसारखे कलाकार नाटकात असल्यामुळे अनेक मान्यवर, दिग्गज मंडळी यासोबत जोडले गेले. तनुजा.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



रिमा लागू, सदाशिव अमरापूरकर, अशोक सराफ असे अनेक दिग्गज अभिनेते नाटकाच्या प्रयोगामध्ये सहभागी झाले. या नाटकाचे ५० हून अधिक प्रयोग राज्यातील विविध भागांमध्ये झाले. त्यातून साधारण ५०-५५ लाख रुपये जमा झाले. मात्र हा निधी अपुरा पडतोय की काय म्हणून अजून काही वेगळे प्रयत्न करायचे ठरले. पुढील दहा वर्षे २ ते ३ टप्प्यांत यासाठी प्रयत्न करण्यात आले. १९८८ पासून ते १९९५-९७ पर्यंत डॉ. लागू आणि निळूभाऊंनी मराठीतील मूक नाटक हिंदी, इंग्रजीत बसवून त्याचे देशासह परदेशातही काही प्रयोग केले. तसेच लागू आणि फुले दरवर्षी त्यांच्या कमाईतील पैसे निधीमध्ये देणगी म्हणून देतच होते. शिवाय व्यक्तिगत पातळीवरही काही कार्यकर्त्यांना त्यांनी अनेकदा मदत केली आहे. अशा पद्धतीच्या लागूंच्या तो प्रवास, संवाद सुरू झाला.

(शब्दांकन - रश्मी माने)




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## पीडीपतील दिवस ......

मी अभिनय करायला लागलो, तो काळ माझ्यासाठी फार मजेशीर आहे. लहानपणी शाळेत असताना मला नाटकं खूप आवडायची. शाळेत एका नाटकात भागही घेतला होता. पेरूगेटजवळची भावे हायस्कूल ही माझी शाळा. त्या वेळी आमच्या मास्तरांनी गोखले, टिळक, रानडे वगैरे पात्रं असलेलं नाटक बसवलं होतं. त्यात गोपाळ कृष्णा गोखले यांची भूमिका माझ्या वाट्याला आली होती. मास्तरांनी चांगल्या तालमी घेतल्या होत्या आणी आमची भाषणंही तोंडपाठ होती. प्रयोगाचा दिवस उजाडला. सकाळ पासून आम्ही गॅदरिंगच्या हॉलमधील स्टेजवर बंद पडद्यासमोर तालमी केल्या. मात्र प्रत्येक्ष गॅदरिंगमध्ये नाटक सुरू होऊन पडदा उघडला गेला तेव्हा मी विंगेत होतो आणि समोर मला तुडुंब प्रेक्षकवर्ग दिसला माझ्या घशाला गेला तेव्हा कोरडच पडली. मी माझी एण्ट्री विसरलो आणि तसाच विंगेतच उभा राहिलो. मला कोणीतरी स्टेजवर ढकललं; पण माझी दातखिळीच बसली होती. नतर मी जो काही बोलायला लागलो, तो सगळ्यांची भाषणं म्हणूनच गप्प बसलो। या प्रसंगानंतर मात्र मी शपथतच घेतली, की या पुढे मी अभिनयाच्या वगैरे फंदात पडणार नाही. याच जन्मी नाही, तर पुढल्या जन्मीही नाही। मग मी माझं लक्ष चित्रकलेकडे वळवलं. त्या वेळी मी एलिमेंटरी व इंटरमिजिएटच्या परीक्षा वगैरेही दिल्या होत्या. त्यामुळे दहावीनंतर स्वाभावीकपणे कला शाखेत प्रवेश घेण्याकडे माझा कल होता. मात्र वडील प्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांनी अक्षरशः 'ब्रेन वॉशिंग' करत मला विज्ञान शाखेकडे आणि वैद्यकिय अभ्यासाकडे वळवलं. याच दरम्यान माझी ओळख भालबा केळकर यांच्याशी झाली. भालबा त्या वेळी हौशी रंगभूमीवर कार्यरत होते. माझं नाटकात काम करण्याचं वेडही मला स्वस्थ बसून देत नव्हतं. मग आम्ही एकत्र येत आमच्या कॉलेजसाठी नाटकं बसवायला आणि त्यात कामं करायला सुरूवात केली. त्या चार वर्षांत मी चार नाटकांत काम केलं; पण




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



कॉलेज संपल्यावर आता नाटक कुठे करायचं हा प्रश्न समोर आला आणि आपसूकच त्यासाठी काही तरी प्रयत्न करावेत, असं वाटलं. मग आम्ही 'प्रोग्रेसिव्ह ड्रामॅटिक असोसिएशन' अर्थात 'पीडीए' ही संस्था स्थापन केली. पीडीएतर्फे नाटक करताना आम्ही कोणताही प्रकार वर्ज्य मानला नाही.

नाटक...... मग ते इंग्रजीत असो..... आवडलंय ना, मग ते करायचंच सुरुवातीला आई- वडीलांनीही कौतुक केलं, पण नंतर वाद सुरू झाले. परंतू मला नाटकाची आवडच एवढी होती, की मी नाटकात काम करण्यापासून स्वतःला कधी थांबवूच शकलो नाही. त्या वेळी ते सगळं खूपच हौशी पद्धतीचं होतं. पुढे जाऊन नाटक करण्यावर बंधनं येत गेली. तेव्हा लक्षात यायला लागलं की, नाटक हा गंभीरपणे करण्याचा आणि गंभीरपणे बघण्याचा कला प्रकार आहे. मला वाटतं, त्याच वेळी माझ्या नाट्याविषयक जाणिवा ठाम होऊ लागल्या.

त्या काळात बालगंधर्व, नानासाहेब फाटक यांसारख्या दिग्गज नटांपासून ते पार हॉलीवूडच्या नटांच्या अभिनयापर्यंत सगळं पाहिलं. नकळत मनात तुलना सुरू झाली. आपल्याकडील रंगभूमीवरचा अभिनय अतिशय बटबटीत असल्याचं जाणवलं. आम्हाला नानासाहेब फाटक आवडत नव्हते असातला भाग नाही, किंबहुना आजही नाना साहेब हे फार थोर नट होते असंच माझं मत आहे. याच दरम्यान नाटकांच्या तालमींना, प्रयोगाला एक शिस्त हवी हा विचारही माझ्या मनात यायला लागला. मी नाटक बसवताना मला अभिप्रेत असलेल्या शिस्तीचा आग्रह धरू लागलो आणी मला वाटतं तिथेच माझे आणी भालबांचे मतभेद सुरू झाले. कलाकार म्हणजे सैनिक नाही आणि आम्ही इथे नाटक बसवायला म्हणजे मजा करायला येतो, असं भालबांच मत होतं परंतू मला नेहमी वाटायचं की, नाटक म्हणजे गंमत नाही आणि नाटक बसवताना मजा करायचीच तर तर ते देखील शिस्तीनेच केली पाहिजे..... आणि त्या वेळी पार्श्वनाथ आळतेकर ही शिस्त मुरवायचा प्रयत्नही करत होते.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



मी जी शिस्त लावण्याचा प्रयत्न पीडीएत करत होतो, रंगायनमध्ये ती शिस्त सुरुवातीपासूनच होती. विजयाबाईंबरोबर काम करतानाही, त्यांच्याकडे प्रचंड क्षमता असल्याचं जाणवत होतं. पुढे मी अनेक दिग्दर्शकांबरोबर काम केलं. मला वाटतं की, त्यांच्या दिग्दर्शनाच्या शैलीत फरक असला तरी शेवटी सर्वांना एक समान गोष्टच मांडायची असते. त्याहीपुढे जाऊन नट ही सर्जनशीलतेच्या पातळीवर दिग्दर्शकाला खूप मदत करतो आणि त्यानं ती तशी करणं अपेक्षित आहे.

डॉ लागू...






भूमिका जगताना...



## भूमिका जगायची नसते .........

मी मेडिकलचं पुढील शिक्षण घेण्यासाठी कॅनडा आणि नंतर इंग्लंडला गेलो. तिथे तीन-चार वर्षांच्या काळात प्रचंड चांगली नाटकं पाहिली. ही नाटकं पाहताना काही गोष्टी प्रकर्षानं जाणवल्या. नाटक करताना प्रत्येक नटाचा पोहोचायाचा बिंदू एकच असतो; पण काही नट अतिशय आक्रमक, बटबटीत अभिनय करत त्या बिंदूपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात, तर काही अतिशय संयत आणि ताबा ठेवून त्या बिंदूला गवसणी घालतात. डोळ्यांची वा हातांची छोटीशी हालचालही अभिनेत्याला हवा तो परिणाम साधून देऊ शकते. त्यासाठी आक्रस्ताळेपण करण्याची गरज नाही. ही दुसरी पध्दत मला जवळची वाटली आणि मी ती अवलंबली. भारतात परतण्याचं निश्चित केलं तेदेखील या वेडापायी. त्यामुळे परत आल्यानंतर अभिनय क्षेत्रात कसे पाय रोवायचे, हा प्रश्न पडला नाही. एकामागोमाग एक नाटकं येत गेली. माझं पहिलं गाजलेलं नाटक म्हणजे 'इथे ओशाळला मृत्यू'। त्यातली संभाजीची भूमिका - मला संभाजी जसा दिसला, त्या पध्दतीनं केली. ती भूमिका साकारताना जाणवलेली एक गोष्ट म्हणजे, ऐतिहासिक भूमिका करताना त्या नेमक्या कशा पध्दतीनं साकाराव्यात, या बद्दल मला तरी ठोस असं काहीच कळलेलं नाही. ती फार बटबटीत केली तर स्वतःला पटत नाही आणि अगदी 'एकच प्याला' मधल्या सुधाकरासारखी केली तर प्रेक्षकांना अपील होणार नाही. त्यामुळे सुवर्णमध्य काढण्याची गरज मला जाणवली पण त्या वेळी नैसर्गिक अभिनय म्हणजे पावित्र्यभंगच समजला जायचा, हे देखील खरं.

या साऱ्या प्रवासात मला जास्त भावलेले नाटककार म्हणजे- विजय तेंडुलकर । तेंडुलकरांनी आपण व्यवहारात वापरतो तशीच भाषा वापरून नाटकं लिहिली. त्या वरून त्यांच्यावर टीका झाली, पण त्यांची शैली






तशीच होती. मात्र, प्रेक्षकांना ती कळायचीच नाही। 'काचेचा चंद्र' या नाटकाच्या बाबतीत तसेच झाले त्या नाटकाचे तब्बल २८ प्रयोग वायाच गेले. त्यात छोटे- छोटे सीन्स होते; पण प्रेक्षकांना त्या नाटकात काय चाललंय, हे कळायचंच नाही. तेंडूलकरांनी नाटकातला नाटकीपण काढून त्यात नैसर्गिकपणा आणला होता. मी, विजयाबाई, तेंडूलकर, जब्बार आम्ही असे एकत्र आलो, त्यामुळे त्या नाट्यचळवळीला वेग मिळाला एवढंच. पण एकट्यानंच कोणी तसं करण्याचा प्रयत्न केला असता, तर ते शक्य झालं नसतं......

नाटकात काम करत असतानाच मला सिनेमाची ऑफर आली आणि ती देखील व्ही. शांताराम यांच्यासारख्या चित्रपटाकडून। पण त्याही वेळ माझं मत हेच होतं की, नाटकातला अभिनय, चित्रपटातला अभिनय असं काही वेगळं नसतं अभिनय हा अभिनय आहे. मग तो फार तर चांगला अभिनय किंवा वाईट अभिनय, एवढाच फरक त्यात असू शकतो. त्यातही सिनेमात काम करणं म्हणजे काही तरी कमीपणाचं आहे, असं मला कधीच वाटलं नाही. नाटकाच्या आधी सिनेमा आला असता, तर लोकांनी कदाचित नाटकाला हिणवलं असतं. एक मात्र खरं की, सिनेमात टेक्निक किंवा तंत्रज्ञानामुळे हळूहळू नैसर्गिकपणा आला. पण तो यायलाही काही काळ जावा लागला. सुरूवातीचे काही चित्रपट पाहिले, तर ते म्हणजेच थेट नाटकांचीच प्रतिकृती वाटावे एवढे बटबटीत होते.

तर......'पिंजरा' करतानाही मी त्यांना माझ्या अभिनयशैलीबाबत सांगितलं होतं. त्यांनी माझी नाटकंही पाहिली होती. त्यामुळे त्यांनी माझ्यावर कधीच दबाव आणला नाही. माझं नाटक पाहून त्या वेळी ते म्हणाले होते कि, "ही इज डिलिव्हरिंग द गुड्स"। त्यामुळेच मी 'पिंजरा' मध्ये माझ्या पद्धतींनं काम करू शकलो. एखाद्या नटानं एखादी भूमिका खूप उत्तमरीत्या साकारली, तर - 'तो नट ती भूमिका खूप उत्तम जगला' असं आपण सर्रास म्हणतो. पण 'भूमिका जगणं' हे नाटकातलं आवश्यक तर नाहीच, पण हानिकारक आहे. आपण भूमिका जगायची नसते, तर ती जगत असल्याचा आभास निर्माण करायचा.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक

# आशय फेब्रुवारी २०२०



## नाटक..... नटासाठी की प्रेक्षकासाठी ?

**अनेकदा असा** वाद होतो की, नाटक हे नटानं स्वतःसाठी करायचं की प्रेक्षकांसाठी? याला माझं उत्तर आहे प्रेक्षकांसाठी। पण म्हणून नटानं स्वत्व जपायचं नाही, असंही नाही. कसं होतं की, एखादी भूमिका नटाला आवडते आणि तो विशिष्ट पद्धतीने ती साकारतो. पण तो प्रयोग लोकांना आवडेलच असंही नाही. कधी-कधी नटाला एखादं काम अजिबात आवडलेलं नसतं; पण लोकांनी ते डोक्यावर घेतलेलं असतं. अशा वेळी लोकांच्या म्हणण्याला आदर दिला पाहिजे. लोकांसाठी करतो म्हणूनच त्याला 'प्रयोग' म्हणतात ना. नाटक स्वतःसाठी करायचं असेल, तर मग ते रंगमंचावर कशाला करायला हवं? घरी आरशासमोरही ते करता येईल. अनेकदा एखादी भूमिका आपल्याला ठरावीक पद्धतीनं करायची असते, पण ते जमत नाही. मग आपण तीच भूमिका वेगवेगळ्या पद्धतीनं साकारायचा प्रयत्न करतो. असं माझ्या बाबतीत अनेकदा झालं आहे. त्यामुळे काही बाबतींत अजूनही मी हौशी नटच आहे।






माझे करियर...

डॉ. श्रीराम लागू १९४६ च्या जूनमध्ये पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाले. यापूर्वी हे स्कूल होतं, जिथे एल.सी.पी.एस आणि एल.एम.पी. अशा पदविकांचा अभ्यासक्रम होता. एम.बी.बी.एस. चा अभ्यासक्रम असलेली तीनचं कॉलेजं त्या वेळी मुंबई प्रांतात होती. तिथे प्रवेश न मिळालेले विद्यार्थी या स्कूलमध्ये यायचे. पण येथे ससून हॉस्पिटल मोठं होतं. पुण्यात डॉक्टर्सही नामवंत होते. त्यामुळे १९४६ मध्ये या स्कूलचं रूपांतर कॉलेजमध्ये करण्याचं सरकारनं ठरवलं. मुंबई विद्यापीठ होतचं. संबंध कॉलेजात जेमतेम दोन-अडीचशे विद्यार्थी! नवीन कॉलेज प्रथमपासूनच चांगलं मार्गी लागावं म्हणून प्रिन्सिपलच्या जागेवर नेमणूक झाली ती डॉ. बी.बी. दीक्षित नावाच्या एका फिजिऑलॉजी तज्ञाची. श्रीराम लागूंनी तर पहिल्याच वर्षी कॉलेजच्या नियतकालिकात त्यांचं एक शब्दचित्र रेखाटलं होतं. मेडिकल स्कूलची एक वेगळी खासियत म्हणजे नाटकं, जी पुण्यात चांगलीच नावाजलेली होती. मेडिकल कॉलेजची गॅदरिंग आता जवळ आली होती. त्याची एक वेगळी कमिटी होती. या कमिटीमध्ये डॉ. लागूंना "ड्रामा सेक्रेटरी" होण्याची सुवर्णसंधी मिळाली. कारण हिशोब असा होता की, सेक्रेटरी झाल्यावर नाटकात काम मिळणारच! 'एकच प्याला' हे नाटक करून त्यात सुधाकरची भूमिका लागूंनी केली.

मेडिकल कॉलेजमध्ये शिकता शिकता डॉ. श्रीराम लागूंनी 'भाववंधन' (प्रभाकर), 'लग्नाची बेडी' (डॉ. कांचन), 'पुण्यप्रभाव' (वृंदावन) ही मोठी नाटकं आणि 'तुझं माझं जमेना', 'उपटसुंभ', 'कुलवर', 'मागणी', 'बिचारा डायरेक्टर', 'राजसंन्यास' इत्यादी छोटी नाटकं ही चार वर्षांत केली. म्हणजे डॉ. लागूंना मेडिकल कॉलेजमधून केवळ शरीरशास्त्रचं नाही, तर खेळ, व्यायाम, बौद्धिक संपदाही मिळाली.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ. श्रीराम लागूंना या मेडिकल कॉलेजच्या पाच वर्षांत खूप काही मिळालं. नाटकाच्या अनुभवामुळे आत्मविश्वास निर्माण झाला. उदारमतवादाचं, बुद्धिप्रामाण्यचं बीजही त्याचं काळात रुजलं. कादंबऱ्यांत, सिनेमा-नाटकांत त्यांनी वाचलेलं, पाहिलेलं, आयुष्य उजळून आणि उधळून टाकणारं पहिलं प्रेमही त्यांना याचं काळात मिळालं! त्याच काळात, दीडशे वर्ष पारतंत्र्यात खितपत पडलेल्या आपल्या देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळालं. देश छिन्न-विच्छिन्न झाला; शुभंकर, परमदयाळू, विघ्नहर्त्या परमेश्वराच्या आणि अल्लाच्या नावानं स्थापन झालेल्या धर्मांच्या आंधळ्या अनुयायांनी आपल्या लाखो बांधवांचं, आयाबहिणींचं रक्त गटारात ओतून दिलं; क्रूर, आंधळ्या रखरखीत वाळवंटात फूलबागांचे ताटवेच ताटवे फुलवण्याचा ज्यानं जिवापाड प्रयत्न केला, पृथ्वी नावाच्या एका क्षुद्र ग्रहावर जो जन्माला आला त्या मानवाला ज्याने नक्षत्रांच्या उंचीवर नेण्याचं स्वप्न पाहिलं, त्या गांधी नावाच्या माणसाचा सर्वांनी मिळून खून केला, पाठोपाठ महाराष्ट्रभर ब्राम्हणांच्या घरांची जाळपोळ, आभाळाचा कर्मठ सांधा फुटेल आणि वसुंधरेच्या अर्ध्या अंगाला तडा जाईल असं वाटायला लावणाऱ्या त्या सर्व घटना त्याच काळात घडत होत्या आणि डॉ. लागू मात्र त्यांच्याच मस्तीत दंग!

पुन. बी. बी. एसचं शेवटचं वर्ष आलं, नाटकांमुळे, भर परीक्षेतही नाटकांचा सराव आणि प्रयोग करत असल्यामुळे डॉ. लागू परीक्षेत नापास झाले. डॉ. लागू ऑक्टोबरच्या परीक्षेसाठी तयार होते. पण अभ्यासापेक्षाही त्यांना चिंता होती, की आता कॉलेज सुटणारं तर मग नाटकं कुठे करायची! त्यांची भेट जयंत आणि भालबा यांसोबत झाली. तिघांनी मिळून स्वतःची नाटकासाठी संस्था सुरू करण्याचे ठरविले. पाहताच त्यांची नाटक संस्था सुरू झाली आणि त्यामध्ये सर्व वेगवेगळ्या महाविद्यालयाचे



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



हौशी कलाकार होते. भालबा वाडियाचे, जयंत फर्ग्युसनचे, डॉ. लागू मेडिकलचे, लीला देव एस. पी. कॉलेजच्या, ताराबाई घारपुरे बी.ए. च्या होत्या. त्यामुळे त्यांनी संस्थेचं नाव ठेवलं 'इंटर कॉलेजिएट ड्रॅमॅटिक असोसिएशन!' खूप मेहनत घेऊन भालबांनी 'उद्याच्या संसार' बसवलं आणि मुंबईला एका स्पर्धेत नाटकाला चक्क पहिलं बक्षीस मिळालं. एवढ्या सगळ्या काळात डॉ. श्रीराम लागू एम. बी. बी. एस. पास झाले आणि मालती रेगे यांच्याशी लग्न झाले. आणि डॉ. श्रीराम लागू पदव्युत्तर शिक्षणासाठी ससून हॉस्पिटलमध्ये हाऊसमनशिप करू लागले. त्यांची बायको सुदधा मेडिकल कॉलेजातच शिकत होती. त्यांचं माहेर कॉलेजापासून जवळ असल्यामुळे त्या माहेरीच राहत होत्या. डॉ. श्रीराम लागू नाक-कान-घसा सर्जरीच्या विभागात असल्यानं त्यांना जास्त काम नसायचं. त्यांना ५ नंतरचा वेळ हा मोकळा, उंडारायला असायचा.

डॉ. लागूंची संस्थेसोबत नाटकं चालूच होती. पुण्याच्या वर्तमानपत्रात चक्क त्यांच्या नाटकांची परीक्षणं छापून आली. एकाने त्यांच्या नाटकासाठी लिहीले होते, "नाटक पाहतो आहोत, असं वाटलच नाही. एखाद्या घरात शिरून, आडोशाला उभं राहून तिथं घडणाऱ्या साऱ्या घटना प्रत्यक्ष पाहतो आहे, असं वाटलं!" "उद्याच्या संसार" हे नाटकं सगळीकडे गाजत होता. आठ-पंधरा दिवसांनी पुण्याच्या वर्तमानपत्रात बातमी आली. अंतिम फेरीचा निकाल लागून पी. डी. ए. च्या 'उद्याच्या संसार' ला पहिले बक्षीस मिळाले होते. रूपये अडीच्च हजार फक्त! एका रात्रीत संस्था एकदम श्रीमंत झाली होती. भालबा बक्षीस समारंभासाठी मुंबईला जायला निघाले. डॉ. लागूंना काही राहवेना, ते स्वखर्चाने भालबांबरोबर मुंबईला जायला निघाले. तिथे बक्षीस समारंभात गेल्यावर समजलं की, अभिनयासाठी सुद्धा स्वतंत्र असे १० क्रमांक काढण्यात आले होते. आणि पहिलेच नाव डॉ. लागूंचे पुकारण्यात आले.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



१०१ रूपये रोख आणि रौप्य पदक ! या पारितोषका नंतर डॉ. लागूंना अभिनयाकरता पारितोषिकं मिळवण्याची एक वेगळीच सवय लागली होती, अगदी म्हातारपणी देखील ही सवय काही सुटली नाही. असो..... डॉ. लागू नाटकाच्या दुनियेत पुढे वाटचाल करीत होते. सर्व व्यवस्थित, खुशालीने चालू होते. डॉ. श्रीराम लागू यांना एका कॉलेजातल्या मित्रानं एक नवीन नाटक लिहून दिलं. त्यांचं नाव वसंत कानेटकर असं होत. त्यांनी लिहीलेल्या नाटकाचं नाव होत 'वेड्याचं घर उन्हातं' नाटक वाचन भालबांच्या घरी चालू होत, नाटकप्रेमी असल्यामुळे अगदी सुरूवातीच्या पंधरा मिनिटांतच डॉ. लागू नाटकात पार गुंतून गेले. डॉ. लागू दादासाहेब या नाटकातल्या एका भूमिकेत नखशिखस्त गुंतून गेले. संपूर्ण नाटक ऐकतानाच डॉ. लागूंनी ते साक्षात अनुभवलं ! 'जगन्नाथाचा रथ' नाटकानं अगदी ठार वास्तवदर्शी नाटकाचा नमुना सर्वांसमोर ठेवला होता. प्रेक्षकांच्या अभिरूचीला एक वेगळं वळण लावण्याचं आश्वासन त्या नाटकात होत; त्यामुळेचं प्रेक्षकांच्या अभिरूचीला शरण न जाण्याचं अवघड आव्हानही होत. त्यांचे सगळे नाटक खूपच भडक आणि बटबटीत वाटायचे. पण नाटकाचे मात्र फार छान होते. एकूण प्रयोगाच्या बांधीलपणा, त्याची प्रकाशयोजना, नेपथ्य या सर्वांचा एकजीव परिणाम खूप गडद वाटत असावा.

डॉ. श्रीराम लागू यांचे निवासी वसतिगृहही ससून हॉस्पिटलच्या मानाने, चैनीचे होते. प्रत्येकाला स्वतंत्र खोली, स्वतंत्र टेलिफोन, उत्तम फर्निचर, आठवड्यातून दोनदा परीटघडीच्या स्वच्छ चादरी, अभ्रे, हॉस्पिटलमध्ये काम करताना घालण्याकरता वेगळे कपडे होते. सगळ्या सोयी-सुविधा या वसतिगृहामध्ये डॉ. लागूंना मिळत होत्या. डॉ. श्रीराम लागू इथे डॉक्टरांच्या पार्टीज मध्ये जात असत. डॉ. श्रीराम लागू




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



एकदा डॉ. मदन अरोरा ; लागूंचेच सहकारी डॉक्टर यांच्यासोबत त्यांच्या खोलीवर गेले. गप्पा मारता मारता दोघेही वाईन आणि रम पित होते. अचानक हॉस्पिटलमधून इमर्जन्सी कॉल आला. एक तीन वर्षे वयाच्या रूग्ण खूप सिरीयस होता. डॉ. लागू कॉलवर असताना मित्राकडे गप्पा मारत बसले असल्यामुळे अचानक आलेल्या या इमर्जन्सी फोनमुळे ते एका क्षणातच हडबडले, पाय लटपटत होते, चेहरा घामाने ओलाचिंब झाला होता. अशाच अवस्थेत ते धडपडत, चाचपडत कसेबसे हॉस्पिटलात त्या रूग्णाच्या खोलीत जाऊन पोहोचले. ऑपरेशन थिएटरमध्ये अगदी सर्व तयारी करून लागू तिथे उपस्थित झाले; चेहरा अजूनही थक्क आणि दमलेलाच होता, हृदयाचे ठोके जोरजोरात धडकत होते. समोर पाहतात, तर तीन वर्षांची गुटगुटीत पोरगी, गुटगुटीत म्हणजे श्वासनलिका सापडायला त्रास ! तिच्या डोळ्यांत सगळे त्राण संपल्याचा विलक्षण हताश भाव दिसत होता. डॉ. लागूंना श्वासनलिका सापडली, त्यांनी त्यात रूपेरी-ट्रेकिऑस्टमी नलिका अडकवून दिली. तिच्या फितीची गाठ मानेच्या मागच्या बाजूला बांधली. लहानग्या तीन वर्षाच्या पेशंटने एक दीर्घ, मोकळा श्वास घेतला आणि एका क्षणार्धातच ती झोपी गेली. आता काळे-निळे पडलेले ओठ, गाल, कान पूर्ववत गुलाबी झाले होते.

डॉ. लागूंनी हातमोजे काढले, नाकावरचा मास्क खाली केला आणि अंगातला गाऊन काढून, त्याचा बोळा करून समोर उभ्या नर्सच्या हातात दिला. तिने लागूंना विचारलं, हे काय? आज ऑपरेशन करताना एवढा गप्प का होतास? एवढा ओलाचिंब घामाने थरथरला आहेस! तापबिप आहे का तुला? डॉ. लागू उत्तरले; नाही, घाबरलो होतो. पॅराशूट उघडणारच नाही, असं वाटलं होतं! असं म्हणून ते दोघेही हसायला लागले. डॉ. लागू कपडे बदलण्यासाठी त्यांच्या खोलीत गेले आणि तिथे



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



घसाघसा रडू लागले. कारण हे कॅनडा होतं, पुणे नव्हे! कॅनडामध्ये कामाव्यतिरिक्त दुसरे काहीच काम करण्यासारखे डॉ. लागूंकडे नव्हते. पुस्तके अगदी तुरळक, तर नाट्यगृह एकही उपलब्ध नव्हते. दुसऱ्या महायुद्धानंतर तर एकंदरीतच सिनेमाचा दर्जा फारच घसरलेला असल्यामुळे लागूंकडे हिवाळ्यात गावात हिंडणे याची आठवण येत असावी. मॉन्ट्रियलचा हिवाळा लागूंसाठी फारच कंटाळवाणा असावा. आठवड्यातून तीन-चार दिवस लागूंना सुट्टी असायची, त्यावेळी मात्र लागूंनी आसपासचा परिसर पाहून घेतला. अशावेळी ते न्यूयॉर्क, नायगारा, ऑटवा अशा ठिकाणी नाट्यगृह उपलब्ध असल्यामुळे बहुतेकदा जात असत. कॅनेडियन हॉस्पिटलमध्ये डॉ. लागूंनी खूप नाटकांचा आस्वाद घेतला.

डॉ. लागूंना कॅनेडियन हॉस्पिटलमध्ये फारसे काही शिकायला मिळत नव्हते. म्हणून पुढच्या शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. 'होमेरिक' या इटालियन जहाजाने डॉ. लागू अटलांटिक समुद्र ओलांडून इंग्लंडला गेले. इंग्लंडच्या 'प्लिमथ' बंदरात उतरून, तिथून एक खास आगगाडी लंडनला जायला निघाली. लंडनमध्ये डॉ. लागू जगप्रसिद्ध ग्रेट डॉ. आर्मंड स्ट्रीट यांच्या 'हॉस्पिटल फॉर सिक चिल्ड्रन' या हॉस्पिटलात निवासी डॉक्टरांची नोकरी करू लागले. डॉ. लागूंसाठी ही अगदी आनंदाची व खुशालीची नोकरी होती. कारण नाटक पाहायला लंडनसारखं शहर जगात कुठेच नाही! त्यांनी तिथे 'रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्समध्ये' परीक्षेकरता नाव नोंदवलं आणि पदवी पदरात पाडून घेण्यासाठी अभ्यासाला लागले. लंडनमध्ये डॉ. लागूंची भेट डॉ. तारा वनारसे या एका आवडीच्या कथा लेखिकांसोबत झाली. त्याही स्वभावाने अगदी लागूंसारख्या; म्हणजेच जरा बुजऱ्या, एकदम चटकन मित्रमैत्रिणी न जोडणाऱ्या आणि साहित्य, नाटके, ललितकलांवर प्रेम करणाऱ्या! डॉ. लागूंच्या पत्नी मालती रेगे त्यांची मैत्रिण असल्याने




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक

# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ. लागू पुण्याहून लंडनमध्ये येणार आहेत, हे त्यांना कळवले सुद्धा होते. डॉ. तारा वनारसे आणि डॉ. श्रीराम लागू यांची अगदी पक्की मैत्री जमली. दोघेही नाटकप्रेमी असल्यामुळे विचारधारा जुळत होती आणि आवडी निवडी सुद्धा बऱ्याचशा सारख्याच होत्या, त्यामुळे डॉ. लागू लंडनमध्ये अगदी रमून गेले होते. डॉ. लागूंनी पुढे नाटकं लिहायला सुरुवात केली. ती म्हणजे त्यांच्या एका नाटककार मित्राच्या पत्रव्यवहारातील आग्रहाने.

डॉ. श्रीराम लागू जया यांना नेहमी म्हणायचे, "प्रत्येक नाट्यप्रयोग म्हणजे चित्रकारानं रंगवलेलं सुंदर चित्र दिसलं पाहिजे. चित्रातला चेहरा, नाक, डोळे, ओठ सगळे सारखेच सुंदर आणि काळजीपूर्वक रंगवले पाहिजेत. कानातला डुलसुद्धा तितकाच महत्त्वाचा. एवढंच नाही तर चित्राच्या कोपऱ्यात मारलेला रंगाचा एखादा फराटासुद्धा चित्राचा तोल सांभाळू किंवा बिघडवू शकतो!" डॉ. लागू एकदा आल्बर्ट हॉलमध्ये संगीताच्या जलशां-करता गेले होते. त्यांना व्हायलीन हे वादय तिथे वाजलेल ऐकून त्याबद्दल कधी न वाटलेले प्रेम निर्माण झाले होते. जसं बिस्मिल्लाची सनई ऐकून सनईबद्दल झालं होतं. डॉ. श्रीराम लागू यांना इंग्लंड मधले गाजलेले नट अलेक गिनिस हे फार आवडत होते. अलेक गिनेस यांनी डॉ. लागूंना एकदा एका संकटातून सोडवले होते. ते म्हणजे; एका चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी डॉ. लागू कॅनडाला निघाले होते. न्यूयॉर्कला विमान बदलून जायचे होते. डॉ. लागूंचे एअर-इंडियाचं विमान असल्यामुळे सगळे उतारू भारतीयच होते आणि अमेरिकन विमानतळावरच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने भारतीय हे अतिशय संशयास्पद चारित्र्याचे, काहीतरी लांडीलबाडी करून अमेरिकेत अंतर्धान पावू पाहणारे! तिथे तपासणीकरता चार-पाच छोट्या काचेच्या केबिन्स एका रांगेत होत्या आणि प्रत्येक केबिनसमोर एक लांबलचक रांग. कॅनडाला कागदपत्रांची करून तपासणी होत असे. त्या लांबलचक रांगेत डॉ. लागू सुद्धा उभे होते. सगळ्या रांगाची तपासणी संपली होती. केवळ




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ. लागूंची रांग अर्धीमुर्धी संपली होती. डॉ. लागूंचा नंबर आला. त्यांनी कागदपत्रे खिडकीतून आत ढकलली तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याने पासपोर्ट उघडलं आणि लागूंना विचारलं. "अच्छा, तू नट आहेस काय?" असं म्हणून केबिनच्या मागच्या बाजूला जाऊन काहीतरी शोधू लागला. त्या अधिकाऱ्याने एक छोटेसं, जुनाटं, पुस्तक टेबलावर लागूंच्या पुढ्यात सरकवले आणि खेसकावून विचारलं "हे पुस्तक वाचलयसं का?". लागूंनी पुस्तक उघडून व्यवस्थित बघितले, 'अलेक् गिनेस. लेखक : केनेथ टायनन'. आणि अर्थात लागूंचा आवडता नट असलेल्या गिनेस यांची आत्मकथा त्यांनी वाचलेलीच होती, त्यामुळे लागू एकदम उजाळले, आणि म्हणाले. "हो, अर्थातचं वाचलयं. हे तर माझं बायबल आहे!" "होय ना? माझं पण!" असं म्हणून तो अधिकारी एकदम गोड हसला आणि लागूंची कागदपत्रे नीट वाचूनही न बघता भराभर शिक्के मारुन सह्या करताना म्हणाला, "मी नट व्हायचा प्रयत्न करतोय. पण गिनेस थोर आहे ना!" इथे असा गमतिशीर प्रसंग जुळला होता की, गिनेस हा विषय दोघांच्याही आवडीचा होता. आश्चर्य म्हणजे असं की, डॉ. लागू भारतीय, तो विमानतळावरचा अधिकारी अमेरिकन आणि गिनेस ब्रिटीश. जय जगत्!

डॉ. लागूंचा डॉक्टरीचा व्यवसाय उत्तम चालू होता. पण त्यांच्या वडिलांना अजिबात पसंत नसलेले हे आप्रतिष्ठिक, हलक्या दर्जाचे, भलते वेड डॉ. लागूंच्या डोक्यात ठाण मांडून बसले होते, ते सुद्धा अगदी त्यांच्या कॉलेजापासूनच. बालगंधर्वांच्या काळात नटांना राहायला घरे आणि लग्न करायला चांगल्या घरच्या मुली मिळू शकत नसतं, इतका नटाचा व्यवसाय आप्रतिष्ठित मानला जायचा; खरे तर आजही जातोच! डॉ. लागूंचे वडील त्यांना म्हणायचे की, "नाटकात कामे करत राहिलास तर तुझ्या प्रॅक्टिसवर त्याचा परिणाम होणारच. लोकं म्हणणार, नाटक्या आहे, याचा काय भरोसा!" खरे म्हणजे डॉ. लागूंचा विचार असा होता की, पोटापाण्यापुरता




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



सर्जनचा व्यवसाय करायचा आणि उरलेल्या वेळात यथेच्छ नाटके करायची. पण नाटके केल्याने व्यवसायच चालेनासा होणार असेल तर काय करावे? हा प्रश्न लागूंना नेहमीच छळत असे. डॉ. लागूंच्या मनात अभिनयाला, आणि नटाच्या व्यवसायाला घेऊन जी जळमटं होती, ती इंग्लंडमधल्या त्यांच्या वास्तव्यात अगदी झाडून स्वच्छ झाली होती. ज्या निष्ठेने, तळमळीने, अभ्यासूपणे आणि गांभीर्याने त्या देशातील नटनटी अभिनयाचा व्यवसाय करतात आणि ज्या प्रकारचे त्यांचे आर्थिक स्थैर्य, राजमान्यता आणि लोकमान्यता त्यांना मिळत असते, त्यावरून नटाचा व्यवसाय हा अप्रतिष्ठित नसतोच, हे लागूंना पक्के झाले. व्यवसाय प्रतिष्ठित किंवा अप्रतिष्ठित असत नाही, तो करणारी माणसे व्यवसायाला प्रतिष्ठित अगर अप्रतिष्ठित रूप देतात. लफंगे नट ज्याप्रमाणे असतात, त्याचप्रमाणे लफंगे डॉक्टर्सही असतात आणि ज्या समाजात नाटकाकडे बघण्याचा दृष्टिकोन 'करमणुकीचे एक थिल्लर साधन' एवढाच असतो, त्या समाजात नटाला प्रतिष्ठा मिळणारच कशी? म्हणजे नाटकाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे आणि तो बदलण्याची जबाबदारी जितकी साहित्यिकांची, विचारवंतांची आहे, तितकीच ती नाटकवाल्यांची आहे. कदाचित नाटकवाल्यांची अधिक आहे, कारण प्रश्न त्यांच्या अस्तित्वाचा आणि प्रतिष्ठेचा आहे.

खरे म्हणजे, सामाजिक प्रतिष्ठा महत्त्वाची की स्वतः स्वतःशी संपूर्णपणे प्रामाणिक असणे अधिक महत्त्वाचे? भगतसिंगाने, सावरकरांनी किंवा गांधींनी सामाजिक प्रतिष्ठेचा विचार केला होता काय? 'अबव्ह ऑल थिंग्स, टु दाय ओन सेल्फ बी ट्रू!' बाकी सगळे सोड, तू स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धिशी प्रतारणा करू नकोस, असे हे वाक्य एक नाटकवालाच म्हणून गेला होता. असे परदेशी असताना वाघिणीचे दूध बरोबर घेऊन डॉ. लागू मायदेशी; भारतात परतले. १९६१ ज्या जूनमध्ये डॉ. लागू पुण्यात आले होते. वडिलांच्या बरोबरीने ते पुन्हा प्रॅक्टिसला.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



लागले. ताराचंद हॉस्पिटलमध्ये इ. एन. टी. सर्जन म्हणून ते काम करू लागले. आणि अर्थातच 'पी.डी.ए.'ला जाऊन मिळाले. तीन वर्षे नाटकापासून दूर, परदेशी असल्यामुळे नाटकाचे वेड मावळले असेल असे डॉ. लागूंच्या वडिलांना वाटले. पण कसले काय! आता तर लागू अधिक काहीतरी नवे आणि चांगले करण्याची ईर्षा मनात घेऊन आले होते. त्यांच्या वडिलांनीही आता त्यांना विरोध करणे सोडून दिले होते.

१९६२ च्या मध्य काळात महाराष्ट्रात नाटकाकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन मागे टाकून नाटकाकडे, एक गंभीर कलाकृती म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट दिसू लागला होता. वास्तविक पाहता तीसबत्तीस वर्षांपूर्वीच 'नाट्यमन्वंतर' या संस्थेने 'आंधळ्यांची शाळा' सारखी नाटके करून ह्या दृष्टिकोनाचा पुकारा केला होता. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनेक मंडळी या दृष्टिकोनाचा पुरस्कार करत होती. त्यात शिरवाडकर, माधव मनोहर यांसारख्या ज्येष्ठांपासून आत्माराम भेंडे, दामू केंकरे, पुरुषोत्तम दारव्हेकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, भालबा केळकर, विजयाबाई, यांसारखी सर्व निरनिराळ्या शहरांत विखरून असलेली मंडळी, पण एकमेकांच्याही नकळत एकाच दिशेने वाटचाल करणारी, तुलनेने तरुण मंडळीही होती. खरंतर या सर्व मंडळींनी एकत्र येऊन काही संयुक्त करण्याची गरज होती. पण ते शक्य नसले तरी आधुनिक विचारांच्या अधिकाधिक मंडळींनी एकमेकांच्या हातांत हात घालून वाटचाल करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. विजयाबाईंच्या एका कल्पनेला डॉ. लागूंनी अगदी मनापासून होकार दिला आणि लागू पुण्याला परतले. अर्थातच ते पुण्यात गेल्यावर भालबांना भेटले आणि ती कल्पना त्यांना सांगितली. भालबा नाराज झाले! कारण त्यांच्या संस्थेच्या बाहेर जाऊन दुसऱ्यांच्या संस्थेत काम करणे त्यांना एकदम नामंजूर होते.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक



# आशय फेब्रुवारी २०२०

डॉ. लागू भालबांना समजावत म्हटले की, "भालबा, मराठी रंगभूमी ही एक संस्था आहे असे आपण मानले पाहिजे. सोयीकरता आपण निरनिराळ्या शहरांत निरनिराळ्या संस्था काढतो - आपण आपापले काम आपापल्या पद्धतीने करतो. पण अशा आपल्यासारख्या चांगले काम करणाऱ्या नटाला जर निरनिराळ्या संस्थांमध्ये सभासद म्हणून काम करायला मिळाले, तर आपला अनुभव अधिक समृद्ध होणार नाही का? नाट्यसंस्था म्हणजे काय राजकीय पक्ष आहे का? एखादा बुवाचा मठ आहे का? दुसऱ्या एखाद्या संस्थेतला नट तुमच्याकडे आला, तर तुम्ही त्याला अगर तिला आनंदाने तुमच्या संस्थेत प्रवेश देता. हे कसे चालते? 'तुमची संस्था ही जगातील सर्वश्रेष्ठ आणि एकमेवाद्वितीय नाट्यसंस्था आहे.' असा तुम्हाला अहंकार आहे, असा त्याचा अर्थ होत नाही का?" एवढं सगळं ऐकून भालबा चक्क झाले व भालबा निरुत्तरही झाले, म्हणजे जसे नेहमी म्हणत तसेच डॉ. लागूंना म्हणाले, "तुला काय हवं ते कर. तुला कोण अडवणार! पण बाकी कुणाला मात्र मी परवानगी नाही देणार.". पडत्या फळाची आज्ञा घेऊन डॉ. लागू 'रंगायन' कडे पळाले. परंतु "साहित्य संघाची मंडळी" 'ऑथेल्लो' ची परवानगी द्यायला तयार नाहीत. असे डॉ. लागूंना समजले. शेक्सपिअर करण्याचे वेड डोक्यातून काढून टाकण्यास डॉ. लागू तयार नव्हते. त्यामुळे मग 'पी. डी. ए.' त संगळ्यांनी विचार केला आणि शिरवाडकरांचेच 'मॅक्बेथ'चे भाषांतर त्यांनी 'राजमुकुट' करायचे ठरवले. आणि सर्व मंडळी कामाला लागली. नाटकाच्या तालमीसाठी दर रविवारी डॉ. लागू पुण्याहून मुंबईला जायचे आणि रविवारी रात्री उशीराच्या पॅसेंजरने परतून पुन्हा सोमवारी सकाळी कामावर हजर राहायचे. सुरुवातीला छोट्या हॉलमध्ये प्रयोग व्हायचे. मोजक्याच प्रेक्षकांसमोर, पण बरेच प्रयोग लागूंनी केले. खूप बोलबोला झाला, खूप चांगले लिहिले, बोलले गेले. अर्थातच लागू सुखावून गेले.





डॉ. लागू यांचा पहिला मराठी चित्रपट 'पिंजरा'

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## पिंजरा!

एक दिवस प्रयोग संपल्यानंतर दोन गृहस्थ मला भेटायला म्हणून थांबले होते. एक होते रवींद्र नावाचे तरुण हे सिनेदिग्दर्शक व्ही. शांताराम यांचे पुतणे आणि त्यांचे सहाय्यक दिग्दर्शक आणि दुसरे मध्यमवयीन गृहस्थ होते. स्वतः दिग्दर्शक अनंत माने. मी अनेक वर्षात मराठी चित्रपटाच्या बाजूला फिरकलोही नव्हतो. त्यामुळे.


त्यामुळे त्या क्षेत्राबाबतचा माझा अज्ञानीपणा अगाध होता. अनंत माने यांचे फक्त गाजलेले दिग्दर्शक म्हणून मला नाव माहित होते. व्ही. शांताराम हे अर्थात खूप लहानपणापासूनच आदरणीय असलेले नाव होते.

रवींद्र मला म्हणाले, " अण्णासाहेब (म्हणजे व्ही. शांताराम) नवीन मराठी सिनेमा काढताआहेत. त्यात हिरोचे काम तुम्ही करावे असे मी आणि अनंत माने यांनी त्यांना सुचवले आहे. आम्ही तुमची नाटके पाहिली आहेत. आणि आम्हाला खात्री आहे की तुम्ही हीरोच्या कामाला योग्य आहात. पण अण्णासाहेबांनी तुमचे एकही नाटक पाहिलेले नाही.

मी मराठी चित्रपट पहायचा बंद्च झालो होतो. हिंदी आणि इंग्रजीही पाहत नव्हतो. पण कानावर असे होते. की," आता मराठी चित्रपटात काही दम राहीला नाही. मी त्या चित्रपटाची कथा वाचली शीर्षक होते 'पिंजरा'

इतकी छान कथा- पटकथा- संवाद, शांताराम बापूंसारख्या जगप्रसिद्ध दिग्दर्शक, 'राजकमल' सारखी जगन्मान्य चित्रपटसंस्था. एवढे सारे एकत्र आल्यावर मला नकार देण्याचे काही कारणच नव्हते. भीती फक्त एकच होती. शांतारामबापू दिग्दर्शक म्हणून प्रत्येक नटाला - नटीला अभिनय करून दाखवीत आणि सर्वांनी त्यांच्याप्रमाणेच अभिनय केला पाहिजे, असा हट्ट धरत. मी ताबडतोब होकार कळवून टाकला.

मग लगेच एक दिवस शांतारामबापूंची भेट ठरली. राजकमल स्टुडिओच्या आवारातच. शांतारामबापूंचे निवासस्थान आणि कार्यालय होते. तिथेच भेट झाली. आल्याबरोबर अण्णासाहेबांनी अगदी मनमोकळ्या गप्पा मारायला




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



सुरवात केली मी ही मोकळा झालो माझ्या नाटकांबद्दल बोलणे निघाले. 'नटसम्राट' नाटक कुणी लिहिले आहे. असे शांतारामबापूंनी विचारल्यावर मी एकदम उडालोच! 'वि. वा शिरवाडकर' असे मी उत्तर दिल्यावर 'हे कोण शिरवाडकर? असा पुढचा प्रश्न आला. आता मी काय उत्तर देणार? १९७१ साली महाराष्ट्रात, कलाक्षेत्राशी संबंधित माणसाला 'कुसुमाग्रज' किंवा 'शिरवाडकर' ही नावे माहित नसतील हे मला अविश्वसनीय वाटले. माझी बोलतीच बंद झाली. पुढे कोणाशीतरी बोलणं झाल्यानंतर ते म्हणाले," अहो ही त्यांची स्टाईल आहे! बाकीच्या जगाशी आपला काही संबंध नाही असे त्यांना दाखवायचे असते!" मोठ्या माणसांचे अहंकार इतके छोटे?)

'पिंजरा' हा माझा अगदी पहिला चित्रपट असूनही मला कॅमेऱ्यासमोर काम करताना नवखेपणामुळे भीती किंवा दडपण आजिबात जाणवले नाही. खूप चित्रपट (इंग्रजी, हिंदी, मराठी) पाहून चित्रपटातल चांगला अभिनय आणि सामान्य किंवा वाईट अभिनय यातला फरक माझ्या बऱ्यापैकी ध्यानात आलेला होता. मला हे जाणवले होते की अभिनय दोनच प्रकारचा असतो. चांगला आणि वाईट। पण सिनेमातला अभिनय नाटकातला अभिनय, टी.व्ही वरचा अभिनय असे वेगळेवेगळे प्रकार नसतात.

पिंजरा च्या निमित्ताने शांतारामबापूंच्या सहवासात बराच काळ गेला. त्यातही त्यांच्यातला संवेदनक्षम कलाकार संपला असल्याचीच दुःखद जाणीव झाली. पण एक ताठ, जिद्दी व्यक्तीमत्व 'राजकमल' सारख्या चित्रपटसंस्थेचा प्रभावी नेता आणि उतारवयातही अत्यंत कार्यक्षम असलेला दिग्दर्शक या नात्याने त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीत सहभागी व्हायला आनंदच वाटला.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



'पिंजरा' चित्रपटाचे शूटिंग संपता-संपता रवींद्रने मला एक दिवस विचारले." अण्णासाहेब विचारताआहेत. टायटल्समध्ये तुमचं नाव काय घालायचं ?"

मी म्हटलं," नुसंत श्रीराम लागू. मागे 'डॉक्टर' नाही लावायचं

तेव्हा तो म्हणाला, "नाही. तसं नाही. ते म्हणतआहेत. काही वेगळं नाव द्यायचं का ? फिल्मस्टार जसं आमच्या मूळच्या नावापेक्षा अगदी वेगळं नाव घेतात तसं! म्हणजे ' मास्टर- अमुक तमुक' किंवा ' अमुक-तमुक- कुमार असं

मी म्हटलं, "नको रे बाबा! माझं जे काय व्हायचं ते माझ्याच नावानं होऊ दे. दुसऱ्या कुणाच्या नावानं नको!"

रवींद्र जरा निराश होऊनच परतला.

'पिंजरा'ला जे प्रचंड यश मिळाले त्याची अपेक्षा कुणालाच नव्हती. निदान मला तरी नव्हतीच. बाकी. कुणाला असली तर त्यांनी ती व्यक्त केली नव्हती. एक मराठी चित्रपट आपण करतो आहोत. मराठी चित्रपटांचे सामान्यपणे जे होते. तेच सर्वांचे होणार अशीच सर्वांची धारणा होती.

'पिंजरा' पाहून प्रेक्षकांना जसा ब्रह्मानंद झाला तसा हिंदी चित्रपट- क्षेत्रातल्या बड्या- बड्या निर्मात्यांना दिग्दर्शकांना. अभिनेत्यांनाही झाला. कारण हिंदी चित्रपटसृष्टीत ' अण्णासाब' या थोर व्यक्तीबद्दल अतीव प्रेमादर होता. अनेक हिंदी निर्मात्यांनी मुद्दाम 'पिंजरा' आपल्या खाजगी., छोट्या थिएटरमध्ये. आणून पहिला.

'लमाण' डॉ श्रीराम लागू.



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०





'पिंजरा' ने महाराष्ट्रात धुमाकूळच घातला! किती तरी ठिकाणी रौप्य महोत्सव, काही ठिकाणी तर सुवर्ण महोत्सव झाले. सगळ्या वृत्तपत्रांत, नियतकालिकांत तोंड फाटेपर्यंत स्तुती. प्रवासाला जाताना वाटेत कुठलेही गाव लागले तरी तिथल्या रस्त्यावरच्या हॉटेलातून 'पिंजरा'ची गाणी वाजत असायची. मी तर मुकद्दम 'फिल्म-स्टार' झालो. 'नटसम्राट' तर लोकांनी मला आधीच केले होते. त्यात ही भर पडली. नाटकाचा दौरा कुठेही गेला तर प्रत्येक ठिकाणी मला पहायला गर्दी जमू लागली. जिथे नाटक असेल तिथल्या शाळा-कॉलेजच्या स्नेहसंमेलनात 'मला 'प्रमुख पाहुणे' म्हणून जावे लागे. प्रत्येक ठिकाणी मी माझे 'आविष्कार-स्वातंत्र्या'चे भाषण ठोकत असे!

माझा पहिला हिंदी चित्रपट! 'आहट!'

चित्रपट असला तरी माझ्या वाट्याला, नाटकातल्यासारखी लांब-लांब भाषणे होती. हिंदी बोलायची सवय आजिबात नसल्याने पाठांतराला त्रास होत होता. पण पाचही निरनिराळ्या व्यक्तीरेखा मी भिन्न-भिन्न रंगभूषा, वेशभूषा, देहबोली, आवाज बोलण्याच्या पद्धती वगैरे वापरून खूप मेहनतीने करत होतो. नायिकेचे सहकार्य उत्तम मिळत होते. मी साक्षात जया भादुरीबरोबर शूटींग करतोय हे बघायला माझा परिवार 'मेहबूब स्टुडिओत' आला होता. त्यांना भेटून जयाही खूप खूश झाली.

लमाण - डॉ श्रीराम लागू.





'संगीत नाटक अकादमी' पुरस्कार

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## 'संगीत नाटक अकादमी' पुरस्कार

तालमी चालू असताना एक दिवस अचानक तेंडुलकरांचा फोन आला. "अभिनंदन! तुम्हाला यंदाचे संगीत-नाटक-अकादमी अवार्ड मिळाले आहे.

"म्हणजे काय असते ते?" मी अडाण्यासारखा प्रश्न केला. मला खरेच माहित नव्हते. संगीत नाटक-अकादमी ही राष्ट्रीय पातळीवरची शासकीय-स्वायत्त संस्था दरवर्षी संगीत, नाट्य, नृत्य अशा ललित कलांना प्रोत्साहन देण्याकरता त्या-त्या कलाशाखेतील सर्वोत्कृष्टांना पारितोषिक देत असते.

म्हणजेच मी गेल्या वर्षातला भारतातला सर्वोत्कृष्ट नट ठरविला गेलो होतो! हे अविश्वसनीय होते. पण त्याच वर्षी नाट्यदिग्दर्शकाचे पारितोषिक माझा मित्र सत्यदेव दुबेला मिळाले होते.

फेब्रुवारी १९७२ मध्ये 'हिमालयाची सावली' रंगभूमीवर आले आणि एकदमच चालू लागले. म्हातारा-म्हातारी, नायक-नायिका प्रेक्षकांनी विनातक्रार स्वीकारली. अर्थात 'काचेचा चंद्र', 'नटसम्राट' 'पिंजरा' 'गिधाडे' यांची लोकप्रियता पार्श्वभूमीला होतीच. पण अगदी स्वतंत्रपणे 'सावली' लोकांनी-समीक्षकांना आवडले काहींनी हे नाटक 'नटसम्राट' पेक्षा चांगले असल्याचे म्हटले आणि मी स्वतः त्यातला एक होतो.

लमाण - डॉ श्रीराम लागू.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## डॉ श्रीराम लागू यांनी अभिनय व दिग्दर्शन केलेली नाटके


| सन | नाटक | नाटककार | दिग्दर्शक | निर्माता |
|---|---|---|---|---|
| १९५१ | उद्याचा संसार | प्र. के. अत्रे | भालबा केळकर | पी. डी. ए |
| १९५२ | दुरचे दिवे | वि. वा. शिरवाडकर | भालबा केळकर | पी. डी. ए |
| १९५३ | आधळ्यांची शाळा | श्रीधर वर्तक | भालबा केळकर | पी. डी. ए |
| १९५४ | बेबंदशाही | वि. ह. औंधकर | भालबा केळकर | पी. डी. ए |
| १९५६ | जगन्नाथाचा रथ | गो. नी. दांडेकर | भालबा केळकर | पी. डी. ए |
| १९५७ | वेड्यांचं घर उन्हात | वसंत कानेटकर | श्रीराम लागू | पी. डी. ए |
| १९५९ | देवांचे मनोराज्य | वसंत कानेटकर | श्रीराम लागू | पी. डी. ए |
| १९६३ | राजमुकुट | वि. वा. शिरवाडकर | श्रीराम लागू | पी. डी. ए |
| १९६४ | खून पहावा करून | सरिता पदकी | श्रीराम लागू | पी. डी. ए |
| १९६४ | मी जिंकलो! मी हरलो! | विजय तेंडुलकर | विजया मेहता | रंगायन |
| १९६५ | एक होती राणी | श्रीराम लागू | विजया मेहता | रंगायन |
| १९६५ | यशोदा | श्री. ना. पेंडसे | विजया मेहता | रंगायन |
| १९६९ | आधे अधूरे | मोहन राकेश | सत्यदेव दुबे | थिएटर युनिट |
| १९६९ | इथे ओशाळला मृत्यू | वसंत कानेटकर | पुरुषोत्तम दारव्हेकर | नाट्यसंपदा |



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




| सन | नाटक | नाटककार | दिग्दर्शक | निर्माता |
|---|---|---|---|---|
| १९७० | ययाती | गिरीश कर्नाड | सत्यदेव दुबे | थिएटर युनिट |
| १९७० | गुरु महाराज गुरु | चिं.त्र्यं. खानोलकर | श्रीराम लागू | कलावैभव |
| १९७० | गिधाडे | विजय तेंडुलकर | श्रीराम लागू | थिएटर युनिट |
| १९७० | काचेचा चंद्र | सुरेश खरे | नंदकुमार रावते | कलावैभव |
| १९७० | नटसम्राट | वि.वा. शिरवाडकर | पुरुषोत्तम दारव्हेकर | गोवा हिंदू असो |
| १९७२ | हिमालयाची सावली | वसंत कानेटकर | श्रीराम लागू | कलावैभव |
| १९७२ | पप्पा सांगा कुणाचे | सुरेश खरे | नंदकुमार रावते | कलावैभव |
| १९७३ | गार्बो | महेश एलकुंचवार | श्रीराम लागू | रूपवेध |
| १९७३ | राव जगदेव मार्तंड | मंगेश पदकी | अमोल पालेकर व लागू | रूपवेध |
| १९७४ | उध्वस्त धर्मशाळा | गो.पु. देशपांडे | श्रीराम लागू | रूपवेध |
| १९७४ | प्रतिमा | चिं.त्र्यं. खानोलकर | सुलभा देशपांडे | आविष्कार |
| १९७५ | ॲन्टिगनी (अनु) | श्रीराम लागू | श्रीराम लागू | आविष्कार |
| १९७६ | कस्तुरीमृग | वसंत कानेटकर | श्रीराम लागू | कलावैभव |
| १९७८ | मी एक मुख्यमंत्री | वि.वा. शिरवाडकर | प्रवीण जोशी | आय. एन. टी |
| १९८१ | दुभंग | रत्नाकर मतकरी | रत्नाकर मतकरी | रंगयात्री |
| १९८२ | आकाश पेलतांना | अनिल बर्वे | राम मुंगी | माऊली प्रॉडक्शन |



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



| सन | नाटक | नाटककार | दिग्दर्शक | निर्माता |
|---|---|---|---|---|
| १९८३ | कन्यादान | विजय तेंडुलकर | सदाशिव अमरापूरकर | आय. एन. टी |
| १९८५ | एकच प्याला | राम गणेश गडकरी | श्रीराम लागू | रंगयात्री |
| १९८६ | अग्निपंख | प्र. ल. मयेकर | कुमार सोहनी | रंगयात्री |
| १९८७ | शतखंड | अजित दळवी | श्रीराम लागू | स्टॅनिस्लावस्की थिएटर |
| १९८८ | डॉक्टर हुद्दार | श्री. ना. पेंडसे | कुमार सोहनी | अमर |
| १९८८ | आत्मकथा | महेश एलकुंचवार | प्रतिमा कुलकर्णी | रूपवेध |
| १९८९ | चाणक्य विष्णुगुप्त | गो. पु. देशपांडे | श्रीराम लागू | रूपवेध |
| १९९१ | किरवंत | प्रेमानंद गज्वी | श्रीराम लागू | रूपवेध / सुयोग |
| १९९४ | सुंदर मी होणार | पु. ल. देशपांडे | विजय केंकरे | सुयोग |
| १९९५ | क्षितिजापर्यंत समुद्र | महेश एलकुंचवार | महेश एलकुंचवार | थिएटर अॅकॅडमी |
| १९९८ | प्रेमाची गोष्ट ? | श्याम मनोहर | अतुल पेठे | कलावैभव |
| १९९९ | सुर्य पाहिलेला माणूस | मकरंद साठे | अतुल पेठे | मनोरंजन / स्फूर्ती थिएटर |
| २००३ | मित्र | डॉ शिरीष आठवले | विजय केंकरे | सुयोग |




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



डॉ. श्रीराम लागू यांनी भूमिका साकारलेल्या मालिका आणि चित्रपट

शेरशिवाजी १९८७
शालीमार १९७८
श्रीमान श्रीमती १९८२
सदमा १९८३
संघर्षछाया १९९५
समय की धारा १९८६
सम्राट १९८२
सरगम १९७९
सरफरोश १९८५
सरफिरा १९९२
साजन बिना सुहागन १९७८
सामना- मराठी - १९७४
सिंहासन - १९८०
सुगंधी कट्टा
सौतन १९८५
स्वयंवर - मराठी १९८०

कलाकार - १९८३
कामचोर १९८२
कॉमन मॅन १९९७
काला बाजार १९८९
कॉलेज गर्ल १९७८
किताब - १९७७
किनारा १९७७
खानदान १९८५
गजब १९८२
गलियों का बादशाह १९८९
गहराई १९८०
गांधी १९८२
गोपाल १९९४
घरद्वार १९८५
घर संसार १९८६
घरोंदा १९७७



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



इंग्रजी नाटके

| नाटक | नाटककार | दिग्दर्शक | निर्माता |
|---|---|---|---|
| मॅकबेथ | शेक्सपिअर | क्रिस ब्रुमफिट | पिस कॉर्प्स (टबोरा) |
| गुड वुमन ऑफ सेत्झुआन | बर्टल्ड ब्रेख्ट | क्रिस ब्रुमफिट | पिस कॉर्प्स (टबोरा) |

गुजराती नाटक

| | | | |
|---|---|---|---|
| कॉफीनो मुक कप (अनु:) | कांती मडिया | श्रीराम लागू | ओरिएन्टल स्पोर्ट्स क्लब (टबोरा) |





'कलेलली धार्मिकला'

# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




## नाटक कलेतील धार्मिकता

"नाटक हा डोळ्यांनी आणि कानांनी करण्याचा यज्ञ आहे, असे महाकवी कालिदासाने म्हटले होते. हे मला माहित होते. वैदिक संस्कृतीच्या काळात यज्ञाला जे महत्व होते. ते कालिदासाने 'नाटक' या कलाप्रकाराला दिले. इतके महत्व जर नाटकाला हजार- बाराशे वर्षांपूर्वी समाजात होते. तर ते महत्व नाहिसे होत होत, नाटक हा एक हलक्या दर्जाच्या लोकांनी, हलक्या दर्जाची करमणूक करण्याचा सवंग प्रकार कधी आणि कसा झाला.? पाश्चात्य समाजात तो इतका अभिजात आणि प्रतिष्ठित कलाप्रकार कसा मानला जातो. आपल्या देशात तो. आज तसा मानला जात नसेल तर त्याला ते पूर्वीचे स्थान प्राप्त करून द्यायला नको का? मग ते कुणी करायचे? ० लोकशाही समाजात, सधन आणि सुसंस्कृत शासन त्याच्या पाठीशी उभे असले पाहिजे हे तर खरेच आहे., पण आम्ही नटवाल्यांनी त्यासाठी जिवापाड प्रयत्न करायला हवेत., ते आम्ही करतो का? त्यासाठी आम्ही नुसते रंगकर्मी असून पुरेसे नाही. तर अत्यंत धार्मिक असे रंगकर्मी असायला हवे! ते आम्ही आहोत का? आम्ही फक्त पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, सरकार- दरबारी प्रतिष्ठा असल्या गोष्टींच्या मागे लागून नाट्यकलेला तिची खरी प्रतिष्ठा. समाजाला अधिकाधिक सुसंस्कृत, शहाणे, सभ्य, विवेकी बनवण्याचे तिचे अंगभूत कार्य तिला परत बहाल करण्याच्या आमच्या महत्वाच्या कार्यात कुचराई करतो आहोत की नाही.

केवळ कर्मकांडात अडकून पडलेले रंगकर्मी न रहता. खऱ्या अर्थाने रंगकर्मी म्हणून जगता येईल का ते पहायला हवे.

डॉ. श्रीराम लागू



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




## मला दिसलेले डॉक्टर - अजित पवार.

स्थळ : टिळक स्मारक मंदिर, पुणे, : वर्ष : १९८५.

फोर्ड फाऊंडेशनच्या मदतीनं पुण्याच्या थिएटर अकॅडमीनं नव्या नाटककारांचा शोध घेण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती. त्यात प्रशांतच्या आणि माझाही समावेश होता. आम्हाला भारतात कुठंही जायला, नाटक पाहायला, तालमीला हजर राहायला मदत मिळणार होती. त्यांची एकच अपेक्षा होती की, वर्षाच्या शेवटी आम्ही एक नवं नाटक लिहून त्या क्षेत्रातल्या जाणकार मंडळींसमोर वाचून दाखवावं, अपेक्षा साधी वाटत असली तरी सोपी नव्हती. समोर विद्याधर पुंडलिकांपासून तेंडुलकरांपर्यंत नाटककार, पुष्पा भावेंपासून म. द. हातकणंगले-करापर्यंत तगडे समीक्षक, जब्बार पटेल, मोहन आगाशेंसारखे नट / दिग्दर्शक उपस्थित होते. या सर्वांवर प्रभाव पाडण्यासाठी अनेक थोरथोर विषयांचा विचार केल्यानंतर जेव्हा एखादा महिना उरला तेव्हा काहीतरी सुचलं आणि शिबिराआधीच्या अठ्ठावीस दिवसांत कागदावर उतरलं. ते बरं आहे की नाही हे पाहायलाही वेळ नव्हता. तो दिवस उगवला. आल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी वाचू लागलो. हळूहळू प्रतिसाद मिळू लागला, हिंमत वाढू लागली आणि शेवटपर्यंत गेलो. वाचून झाल्यावर उपस्थितांना साधारण बरं वाटलंय म्हणून सुटकेचा निःश्वास सोडत होतो. तेवढ्यात या कार्यशाळेची जबाबदारी ज्यांच्यावर होती ते नाटककार सतीश आळेकर जवळ आले. म्हणाले, 'डॉक्टर लागूंना तुमचं नाटक आवडलंय, करण्याची त्यांची इच्छा आहे. बाकी तुम्ही बोलून घ्या.' मी चकीत. असं कोणी अपेक्षित केलं नव्हतं. नाटक करतो असं कुणीही म्हटलं असतं तरी सहज परवानगी दिली असती. चक्क डॉ. श्रीराम लागू करू इच्छितात? त्यांना बरं वाटलंय? मी जाऊन भेटलो. त्यांनी मी आधी

(P.T.O)



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




काय लिहिलंय याची आस्थेनं चौकशी केली. नाटक करायचंय म्हणाले. ही आमची पहिली भेट!

आम्ही पुण्या-मुंबईच्या मानानं लहान शहरात राहणारी मंडळी. अनेक नाटक-चित्रपटांबद्दल बऱ्याचदा फक्त वाचून समाधान मानणारी. डॉक्टर श्रीराम लागू म्हणजे आमच्या दृष्टीनं अभिनयातले सूर्यच होते. 'वेड्याचे घर उन्हात' पासून त्यांचं नाव ऐकत होते. मला वाटतं. 'मी जिंकलो, मी हरलो' मध्येही तेच होते. 'गिधाडे' सारखं नाटक करण्याची हिंमत तेच करू शकत होते. 'गार्बो' औरंगाबादला येण्याची शक्यता नाही, हे माहित असल्यामुळे ते बघायला मुद्दाम मुंबईला गेलो होतो. माझा सुरुवातीचा सगळा काळ युवक क्रांती दलात गेल्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि कलाक्षेत्रातल्या ठाम भूमिकांविषयी आदर होता. 'अँटिगनी' सारखं व्यवस्थेला आव्हान करणारं नाटक केल्यामुळे त्यांच्याविषयी आदर वाढला होता. अशा अभिनेत्या, दिग्दर्शकानं माझं नाटक करणं माझ्यासाठी महत्त्वाचंच होतं!

मग दूरध्वनीवरून बोलणं सुरू झालं. भेटी सुरू झाल्या. काही प्रमाणात चर्चा सुरु झाली आणि डॉक्टरांनी किती बारकाईनं वाचलंय ते माझ्या लक्षात येऊ लागलं. नाटकात एके ठिकाणी एका संवादातून गॅलब्रेथच्या 'एज ऑफ अनसर्टनटी' या ग्रंथाचा उल्लेख आहे. काही दिवसांत ते पुस्तक मला त्यांच्या टेबलवर दिसू लागलं. नंतर फोन येऊ लागले. डॉक्टर इतर नाटकांच्या दौऱ्यावर असताना सामाजिक भान असलेल्या निकटवर्तीयांना किंवा रंगकर्मींना जमवून नाटक ठिकठिकाणी वाचून दाखवतायत हे लक्षात आलं.

महेश एलकुंचवारांशी फोनवर बोलणं झालं. पॉप्युलरच्या रामदास भटकळांचं नाटक आवडल्याचं पत्र आलं. पुढे कार्यक्रमाच्या निमित्ताने ते भेटायलाही आले. पुष्पा भावेंनी सुंदर प्रस्तावना लिहिली. गो. पु. देशपांडेंचं नाटकाच्या नायकाचं धुंडिराज धांदेफळकरांचं विश्लेषण करणारं पत्रं आलं. त्यातल्या मजकुरावरून नाटकाला

(P.T.O)



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०




'शतखण्ड' हे नावही मिळालं. एका नव्या नाटककरासाठी हे सगळं किती महत्त्वाचं असेल याची कुणीही कल्पना करू शकतं. डॉक्टरांनी माझ्यासाठी अनेक कवाडं खुली केली होती.

भरपूर वाचन, चर्चा झाल्यावर साधारण दोनेक वर्षांनी स्तॅनिस्लावस्की थिएटर नावाच्या नव्या संस्थेतर्फे 'शतखण्ड' रंगभूमीवर आलं. सूत्रधार होते डॉ. रवी बापट. डॉक्टरांशिवाय मीना नाईक, सुनिल तावडे, श्रुती मुजुमदार वगैरे मंडळीही नाटकात होती. डॉक्टरांची बरीच नाटके कमी पात्रांची. इथं भरपूर पात्र होती. बसवायला त्रास झाला असणार; पण त्यांनी मेहनतीनं नाटक बसवलं. त्यांच्या बहुतेक नाटकांतल्या भूमिका अवघ्या अवकाशाला कवेत घेणाऱ्या; पण 'शतखण्ड' मध्ये त्यांना त्याचं रूपांतर एका लहान शहरातल्या विचार आणि आचरण यात विसंगती असणाऱ्या अनेक डगरींवर पाय ठेवून चालू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय प्राध्यापकात करावं लागलं. हे बाह्य रूप काहीसं कुरुंदकरांसारखं होतं. त्यामुळे नाटक त्यांच्यावरच आहे का, असं काहींना वाटलं; पण मला किंवा डॉक्टरांनाही तसं अभिप्रेत नव्हतं. महाराष्ट्रातल्या पुरोगामी म्हणवल्या गेलेल्या अनेकांमध्ये 'धांदेफळकरांची' वैशिष्ट्ये आढळत होती. किंबहुना एखाद्या माणसापुरता प्रश्न असता तर तो नाटकाचा विषयच होऊ शकला नसता. 'धांदेफळकरांची' उंची आणि खोली-ही कुरुंदकरांच्या तुलनेत काहीही नव्हती. अनेक बारकाव्यांनिशी डॉक्टरांनी भूमिका केली. नाटकाचे बावीसएक प्रयोग झाले. नाटक बऱ्यापैकी चर्चेत राहिले.

यानंतरही डॉक्टरांसाठी काही लिहायला आवडलं असतं; पण 'परिवर्तन' या आमच्या संस्थेसाठी लिहिणं, मित्रासाठी लिहिणं यात काही जमू शकलं नाही. यशवंतरावांसारख्या व्यक्तिमत्त्वावर मी एक नाटक लिहिलं होतं. डॉक्टरांनी ते केलं असतं, तर मला आनंद झाला असता; पण त्यात महाभारताचा ओव्हरडोस झाल्यामुळे बहुतेक त्यांना ते करावसं वाटलं नाही. अर्थात, या सगळ्यामुळे त्यांचं काही नुकसान झालं असंही नाही. ते उत्तम भूमिका करतच राहिले. विशेषतः मला

(P.T.O)




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



'सूर्य पाहिलेला माणूस' या अतुल पेठेनं बसवलेल्या नाटकाची आठवण होते. त्यातला सॉक्रेटीसचं शेवटचं स्वगत एखाद्या संगीताच्या मैफलीसारखं शुध्द आनंद देणारं होतं. डॉक्टरांचा 'स्वर' लागला होता आणि आपण फक्त त्या अभिनयाच्या आणि विचारांच्या प्रवाहात डुंबत राहायचं होतं. प्रत्यक्ष बरोबर काम करणं नसलं तरी औरंगाबादला प्रयोग असला की, ते घरी येत. मुंबईला गेल्यावर मी त्यांच्या घरी जात असे. त्यांच्या मानाने तेव्हा माझं वाचन, थिएटरचा अनुभव किती असणार? तरी ते तसं कधीही जाणवू देत नसत. उलट कल्पना ऐकून घेत. पूरक माहिती देत. मला आठवतं सॉमरसेट मॉमच्या 'रेन' या कथेवरून मी चंद्रकांत कुलकर्णीसाठी 'देहधून' लिहित होतो. धर्मगुरू आणि वेश्या यांच्यातील संघर्षाची ती कथा डॉक्टरांना सांगितल्याबरोबर त्यांनी 'रेन' या चित्रपटाबद्दल सांगितलं. वेश्या आणि धर्मगुरू यांच्यातील प्रसंगांना चित्रपटात कोसळत्या पावसाची पार्श्वभूमी होती. वरच्या पत्र्यावर अविरतपणे कोसळत्या पावसामुळे दृश्याचा परिणाम किती गडद झाला असेल, याची मी कल्पना करित राहिलो. शिवाय त्या प्रवासाला प्रतीकात्मक अर्थ होताच.

डॉक्टरांशी बोलणं नेहमीच आनंददायक असे. त्यांच्याकडे अनंत भावे, पुष्पाताई, कधी सत्यदेव दुबे बसलेले असत. अनेक कलाकृतींवर चर्चा होत असे. यातून बरंच काही मिळत असे. त्यांचं व्यक्तिमत्त्व अतिशय पारदर्शक होतं. त्यात आत-बाहेर असं काही नव्हतं. त्यांच्या मुलानं-तन्वीरनं कोणते चित्रपट पाहावेत याबद्दल काहीही बंधन नव्हतं, घरची सेन्सॉरशिप नव्हती. आमच्या नाटकांना ते आवर्जून येत असत. 'डॉक्टर', 'चारचौघी' आणि ते करीत असलेल्या 'किरवंत'वर त्यांनी 'तीन महत्त्वाची नाटके' म्हणून लेख लिहिलेला आठवतो. माझ्या पत्नीनं अनुयानं डॉ. लक्ष्मण देशपांडे यांच्याबरोबर ''त्रिपात्री'-नटसम्राट' मध्ये कावेरी साकारली तेव्हा डॉक्टर बघायला आले होते. त्यांनी तिच्या अभिनयाचं कौतुक केलं होतं. डॉक्टरांनी मला जो वेळ आणि मान दिला तो अजित दळवी नावाच्या व्यक्तीला नसून, नाटककाराविषयीच्या त्यांच्या मनातल्या संकल्पनेला दिला, याची मला जाणीव आहे. त्यांच्या आणि दीपाजींबद्दल थोडंसं लिहू इच्छितो. त्यांच्या

(P.T.O)




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



दीपाजींच्या अकृत्रिम स्नेहाबद्दल मी त्यांचा कायम ऋणी राहीन. दीपाजी ह्या वेगळं व्यक्तिमत्त्व असलेल्या सशक्त अभिनेत्रीचा मराठी रंगभूमीनं पुरेसा उपयोग करून घेतला नाही, असं वाटत राहतं. त्यांच्याशिवाय 'चारचौघी' उभंच राहिलं नव्हतं!

डॉक्टरांच्या उत्तुंग प्रतिमेबद्दल, अभिनयाबद्दल अनेकांनी लिहिलं आहे. त्यांचं वेगळेपण कशात होतं याचा विचार करताना मला विजया मेहतांची आठवण होते. 'आपले नट आणि जर्मन नट यांच्यात काय फरक आहे,' असा प्रश्न त्यांना कुणीतरी विचारला होता. 'आपल्या नटांना मी नुसतं एक बोट दाखवायला सांगितलं, तर ते दहा प्रकारे करून दाखवतील, यापैकी काय प्रयोगात ठेवू, असं विचारतील. जर्मन नटाला तुम्ही तेच करायला सांगितलं, तर तो विचारील का? का मी बोट उचलायचं? हा एक 'का' अत्यंत महत्त्वाचा आहे. तो तुम्हाला विचार करायला लावतो, विश्लेषण करायला लावतो. डॉक्टर प्रत्येक गोष्टीचं कारण समजावून घेणारे अभिनेते होते. विश्लेषण करून भूमिकेच्या तळाशी जाणारे अभिनेते होते आणि त्याचवेळी पात्राच्या अंतरंगातही प्रवेश करू शकत होते. विश्लेषक दृष्टी आणि संवेदनशीलता या दोन्ही गोष्टींचा वापर करून भूमिका साकारणारे अभिनेते आपल्याकडे फार नाहीत. त्यामुळे डॉक्टरांची उणीव बराच काळ जाणवत राहील.




# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



कला हा धर्म मानायचा तर कलेशी निरपवादपणे साधना करायचे सोडून, अंधश्रद्धा निर्मूलन सामाजिक कृत्याला निधी असल्या उचापती कशाला कराव्यात? मेधा पाटकरांनी सांगितले म्हणून, सगळे उद्योग सोडून माणिबेलीला कशाला जायचे? अण्णा हजारांच्याबरोबर उपोषणाला का बसायचे? डॉ नरेंद्र दाभोलकरांच्याबरोबर शनीशिंगणापूरच्या सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगवास का पत्करायचा? बाबा आढावांच्या एकात्मता मोर्चात का सामील व्हायचे? ताहिर पुनावालांसारख्या निधर्मी आणि म्हणून बहिष्कृत मुसलमानाबरोबर का नाते जोडायचे? रझिया पटेलसारख्या, केवळ निर्मळ माणुसकी जपणाऱ्या मुसलमान स्त्रीबरोबर का बंधुभाव जपायचा? कलेच्या साधनेत या गोष्टी कुठे बसतात? बसतात! अभिनय-साधनेत तर नक्कीच बसतात! नव्हे, आवश्यक आहेत!

डॉ. श्रीराम लागू



# डॉ. श्रीराम लागू विशेषांक
# आशय फेब्रुवारी २०२०



## 'नटसम्राट' रंगभूमीची साथ सोडताना..

आपल्या नैसर्गिक अभिनयाच्या बळावर मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे चतुरस्त्र अभिनेते, मराठी रंगभूमीचा अनभिषिक्त नटसम्राट, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. श्रीराम लागू यांचं १८ डिसेंबर २०१९ रोजी वृद्धापकाळाने निधन झालं. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी पुण्यात अखेरचा श्वास घेतला. डॉ. लागू यांच्या निधनाने मराठी रंगभूमीवरील विवेकवादी नट काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

डॉ लागू यांनी तब्बल चार दशकं मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. त्यांनी शंभरहून अधिक हिंदी सिनेमात आणि ४० हून अधिक मराठी सिनेमांमध्ये कामं केलं तसेच २० हून अधिक मराठी नाटकांत दिग्दर्शनही केलं. त्यांनी गुजराती रंगभूमीवरही काम केलं

वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांना नाटकात काम करण्याची गोडी लागली होती. त्यांनी भालबा केळकर आणि इतर सहकार्यांच्या मदतीने पुरोगामी नाट्यसंस्था सुरू केली. मग वैद्यकीय शिक्षण होतल्यानंतर त्यांना कॅनडा आणि इंग्लंडला जावं लागलं.

डॉ लागू हे अभिनयाबरोबरच त्यांच्या परखड विचारांमुळेही ओळखले जायचे. विवेकवादी सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. स्टारडम असूनही त्याचा कोणताही अभिनिवेश न बाळगता प्रत्येक सामाजिक कार्यात ते हिरिरीने भाग घेत असत. 'देवाला रिटायर करा' हा त्यांचा लेख चांगलाच गाजला.

ते अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी जोडले होते.





डॉ. 'भागूंची सहजीवन'